सोमवार, १३ नोव्हेंबर २०२३
किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - ०३ अंक - ९७
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक



●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) MONDAY 13 NOV. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-03 ●ISSUE-97 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-10 ●PRICE-5




# जेथे सैनिक तेथेच माझा सण : मोदी

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हिमाचल प्रदेशमध्ये जाऊन भारतीय सैनिकांबरोबर दिवाळी साजरी केली. यावेळी त्यांनी सैनिकांच्या पराक्रमाचे कौतुक केले. प्रत्येकाला आपल्या कुटुंबाची आठवण येते, अशी भावना मोदींनी व्यक्त केली. तसेच जेथे सैनिक तेथेच माझा सण असेही नमूद केले. ते रविवारी (१२ नोव्हेंबर) हिमाचल प्रदेशमधील लेपचा येथे सैनिकांबरोबर दिवाळी साजरी करताना बोलत होते.


नरेंद्र मोदी म्हणाले, भारतीय सैन्याच्या पराक्रमाचा हा उद्घोष आहे. दिवाळी हा पृथ्वीवरील पवित्र सण आहे. हा फार मोठा योगायोग आहे. माझ्यासाठी हा क्षण समाधान आणि आनंद देणारा आहे. हा क्षण माझ्यासाठी, तुमच्यासाठी आणि देशवासीयांना दिवाळीचा नवा प्रकाश देईल, असा मला विश्वास आहे. कुटुंबाची आठवण प्रत्येकाला येते. मात्र, भारतीय सैनिकांच्या चेहऱ्यावर अजिबात उदासपणा जाणवत नाही. सैनिकांच्या उत्साहात अजिबात कमतरता दिसत नाही. तुमच्यात उत्साह आणि उर्जा भरलेली आहे. कारण तुम्हाला १४० कोटी जनतेचं कुटुंब तुमचंच आहे हे माहिती आहे. संपूर्ण देश यासाठी सैनिकांबद्दल कृतज्ञता व्यक्त करतो, असे मत नरेंद्र मोदींनी व्यक्त केले.













विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

आपले सगळेच सण आपल्या पूर्वजांनी अत्यंत विचारपूर्वक आणि कल्पकतेने ठरवले आहेत. त्यामागे काही एक विशिष्ट उद्देश, अर्थ आहे हे आपण मुलांना उलगडून सांगायला हवे. आज दिवाळीचा सण केवळ भारतातच नव्हे इतरही अनेक देशात साजरा केला जातो. श्रीलंका, नेपाळ, म्यानमार, पाकिस्तान या शेजारील देशात हा सण साजरा होतो. याशिवाय जगात जिथे जिथे भारतीय लोक राहतात, तिथे तिथे हा सण साजरा होतो. आजकाल तर अमेरिकेच्या व्हाईट हाऊसमध्ये देखील दिवाळीचा सण साजरा होऊ लागला आहे ही आम्हां भारतीयांच्या दृष्टीने गौरव आणि अभिमानाची बाब आहे. दिवाळीतील प्रत्येक दिवस आपल्याला काहीतरी शिकवण देतो. साधारणपणे कराष्टमी पासूनच दिवाळी सुरु होते असे लोक मानतात. कराष्टमीला करे म्हणजेच कुंभ किंवा घटांचे पूजन केले जाते. हे पूजन प्रतीकात्मक आहे. कुंभ किंवा घट हा मातृगर्भाचे किंवा गर्भाशयाचे प्रतीक आहे. हा मातृशक्तीचे गौरव करणारा सोहळा आहे. तसा जवळपास संपूर्ण अश्विन महिनाच मातृशक्तीला वाहिला आहे असे म्हणा ना ! नवरात्रीला आपण घटस्थापना करतो. कोजागिरीला लक्ष्मीपूजन करतो. दिवाळीत लक्ष्मी, सरस्वती पूजन करतो. विविध रूपात केलेला हा मातृशक्तीचा गौरव आहे. त्याबद्दलची कृतज्ञता आहे, प्रेम आहे. वसुबारस या दिवशी आपण गायीवासराची पूजा करतो. आपल्या पूर्वजांनी दूरदृष्टीने गायी, बैल आदींना धन मानले होते. म्हणूनच त्याचा उल्लेख गोधन असा केला जातो. गाय ही आपल्या दुधाने आमचे पोषण करते. तिच्यापासूनच शेतीसाठी गोधन प्राप्त होते. तिच्याबद्दलची कृतज्ञता, प्रेम म्हणून हा दिवस साजरा केला जातो. आज काळानुरूप शहरातून गायी पाळणे शक्य नाही, शेतीतही बैलांचा वापर मर्यादित प्रमाणात होतो आहे. पण म्हणून त्यांचे महत्व कमी होत नाही. या गोधनाची ओळख, त्यांचे महत्व मुलांना सांगण्याची जबाबदारी पालकांवर येते.



## आनंदी पहाट

## मन आणि तनाचे अतूट नाते समजून घ्यावे

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

अलीकडच्या काळात आपापसातील संवादाची जागा सोशल मिडीयाने घेतली आहे. ज्या सोशल मीडियातील मजकूर, छायाचित्रे आणि चलतचित्रे सर्वकाही आभासी असल्याचे आपल्या सर्वांनाच माहिती आहे; तरीही आपण आपला सोशल मीडियामधील सहभाग मर्यादित ठेवत नाहीत. त्याचे आपण भक्त होऊन आपल्या अंतर्मनाला रमवण्याचा, आनंदी ठेवण्याचा केविलवाणा प्रयत्न करत असतो. आपल्याला दैनंदिन जीवनात निरनिराळे अनुभव येत असतात, ज्यामुळे आपली मानसिकता बदलत असते. या बदलत जाणाऱ्या मानसिकतेच्या अनुशंगाने सकारात्मक विचार करण्याची जरुरी असते. सोशल मीडियामुळे आपल्या विचारांची दिशाच बदलत चालली आहे, हे सर्वप्रथम आपण समजून घेतले पाहिजे. आपल्या प्रत्येक विचारांत सकारात्मकता असतेच असे नाही. पण आपल्या मनाच्या स्वास्थ्यासाठी तसा अभ्यासपूर्वक विचार होणे आवश्यक असते. मनाला रमवण्यासाठी आणि नवे आजमावण्यासाठी आपल्याच अंतर्मनाचा मानसशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यासपूर्वक विचार करावा लागतो. सोशल मिडीयाचा वापर किती करायचा, त्या माध्यमातून व्यक्तिगत आणि कौटुंबिक पातळीवर काही बिघडणार तर नाही ना हेही बघणे अत्यंत जरुरीचे असते, हे विसरून चालणार नाही. एकूणच बदलत चाललेली जीवनशैली, जीवनमान, गरजा आणि अपेक्षा ह्या सर्वच बाबींचा समाजमनावर आणि विशेषतः बालमनावर होत असलेला विपरीत परिणाम दुर्लक्षित करून चालणार नाही, हे आपल्या प्रत्येकाने स्मरणात घेतले पाहिजे. दिवसेंदिवस निर्माण होत असलेल्या दुराव्याला, रक्ताच्या नात्यातील ओलावा राहण्याची शक्यता कमी होत चाललेली असल्याचे जाणवत आहे. मन आणि तन याचे नाते अतूट असते. मन दिसत नसल्यामुळे ते कळत नाही आणि शरीर मात्र लपत नाही. मनाचा जोपर्यंत तनाशी मिलाफ होत नाही, तोपर्यंत विचार आणि वर्तन यांचे समीकरण जुळत नाही.



आधुनिक केसरी

## आत्मदिपावली | उजळली ||

रोजचाच आम्हा | दिवाळी दसरा ||
संतांचा आसरा | लाभतसे ||१||
आषाढी कार्तिकी | उत्सव आमुचे ||
आम्हासवे नाचे | परब्रह्म ||२||
आत्म्याच्या राउळी | भजनाचा सूर ||
काय आम्हा दूर | निजधाम ? ||३||
ज्ञाना-तुका हेचि | दैवत आमुचे ||
रूप विठ्ठलाचे | तेच आम्हा ||४||
दिव्यत्वाची ज्योत | नामाने चेतली ||
आत्मदिपावली | उजळली ||५||




प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण

आधुनिक केसरी

मातावियोगें कष्टलें । तेणें मानसीं दुःख जालें ।
देहहि क्षीणत्व पावलें । आतिशयेंसीं ॥ १९ ॥
अथवा माताहि वांचली । मायलेंकुरा भेटी जाली ।
बाळदशा ते राहिली । देवसेंदिवस ॥ २० ॥
बाळपण जालें उणें । दिवसेंदिवस होये शाहाणें ।
मग ते मायेचें अत्यंत पेरूणें । होतें, तें राहिलें ॥ २१ ॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !




स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

जंगम तीरथ सन्त हैं, मज्जन सब फल दाय । भूमि भ्रमण जग हित करे, उदय भाग तेहि पाय ।।२४।।(स्वर्वेद तृतीय मण्डल अष्टम अध्याय) ०३/०८/२४मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : संत जंगम तीर्थ (चालते-बोलते तीर्थ) आहेत. त्यांच्या ज्ञान, सत्संग, बोध आणि उपदेशरुपी गंगेत स्नान केल्याने आत्मा पवित्र होतो आणि सर्व फळे प्राप्त होतात. ते जगाच्या कल्याणासाठी पृथ्वीवर भ्रमण करतात. ज्यांचे भाग्य उदय होते त्यांना संतांचे दर्शन होते.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## समर्थ रामदास

आधुनिक केसरी




छातीइतक्या पाण्यात उभे राहून गायत्री मंत्राचे पुरश्चरण करत. दोन तास गायत्री मंत्राचा तर चार तास श्री राम जय राम जय जय राम या त्रयोदशाक्षरी राम मंत्राचा जप करीत. रामदासांनी रामनामाचे १३ कोटी वेळा नामस्मरण करून झाल्यावर कार्याला आरंभ केला. साक्षात प्रभु श्रीराम हेच त्यांचे सद्गुरू झाले असे मानले जाते. समर्थ दुपारी केवळ ५ घरी भिक्षा मागून तिचा श्रीरामाला नैवेद्य दाखवत असत. त्यातील काही भाग पशुपक्ष्यांना ठेवून उरलेला भाग ग्रहण करत असत. समर्थ दुपारी दोन तास मंदिरात श्रवण साधना करीत आणि नंतर दोन तास ग्रंथांचा अभ्यास करीत. याच काळात त्यांनी वेद, उपनिषदे, सर्व प्राचीन ग्रंथ व विविध शास्त्रे यांचा सखोल अभ्यास केला, रामायणाची रचना केली. त्यांच्या या साधकावस्थेमध्ये त्यांनी आर्ततेने श्रीरामाची प्रार्थना केली तीच 'करुणाष्टके' होत. व्यायाम, उपासना आणि अध्ययन या तीनही गोष्टींना समर्थांच्या जीवनात महत्त्वाचे स्थान होते. त्यांच्या जीवनातील ही १२ वर्षे अत्यंत कडकडीत उपासनेमध्ये व्यतीत झाली. १२ वर्षाच्या या तीव्र तपश्चर्येनंतर यांना आत्मसाक्षात्कार झाला, असे म्हणतात. [४] त्यावेळी समर्थांचे वय २४ वर्षाचे होते. समर्थांनी नाशिक येथे टाकळीला हनुमंताची मूर्ती स्थापन केली. हनुमान ही शक्तीची आणि बुद्धीची देवता आहे त्यामुळे तिची उपासना केली पाहिजे असा समर्थांचा यामागे विचार होता. समर्थांची तपश्चर्या संपल्यानंतर त्यांनी १२ वर्षे भारतभ्रमण केले, तीर्थयात्रा केल्या. सारा हिंदुस्थान पायाखाली घातला. प्रत्येक ठिकाणच्या लोकस्थितीचे निरीक्षण केले. पुढे, ते फिरत फिरत हिमालयात आले तेव्हा त्यांच्या मनातील मूळचा वैराग्यभाव जागा झाला. त्यांची देहाबद्दलची आसक्ती नष्ट झाली. आपल्याला प्रभू रामचंद्रांचे दर्शन झाले, आत्मसाक्षात्कार झाला. भारत-भ्रमण करीत असता श्रीनगरमध्ये शीखांचे सहावे गुरू हरगोविंद यांची व समर्थांची योगायोगाने भेट झाली. समाजाच्या दुर्धर स्थितीसंबंधी दोघांची चर्चा/बातचीतही झाली होती. हरगोविंदसिंगांबरोबर १००० सैनिक असायचे. त्यांच्या कमरेला दोन तलवारी असत. त्यांचा हा सर्व सरंजाम पाहून समर्थांना खूप आश्चर्य वाटले. समर्थांनी हरगोविंदांना विचारले - " आपण धर्मगुरू आहात. या दोन-दोन तलवारी आपण का बाळगता ?" तेव्हा गुरू हरगोविंद म्हणाले - " एक तलवार धर्माच्या रक्षणासाठी तर दुसरी स्त्रियांच्या शीलरक्षणासाठी". समर्थांनी पुन्हा आश्चर्याने विचारले - "आणि हा सारा फौजफाटा ?" त्यावर हरगोविंद म्हणाले - " धर्माचे रक्षण करणारे हे सैन्य आहे. सध्या शत्रू एवढे अन्याय करीत आहे, केवळ शांती आणि सलोखा यांनी प्रश्न सुटणार नाही. आपल्याला शस्त्रसज्ज झाले पाहिजे.

## नाम कुठवर घ्यावे ?

आधुनिक केसरी

नाम कुठवर घ्यावे ? आपला श्वासोच्छ्वास चालू आहे, किंवा स्वतःची स्मृती आहे, तिथपर्यंत नाम घ्यावे. आपण श्वासोच्छ्वास जसा मरेपर्यंत घेतो, तसेच नामाचे आहे. बरोबर भाषेत बोलायचे झाले तर असे म्हणता येईल की, श्वासोच्छ्वास थांबला म्हणजे मरण येते, त्याचप्रमाणे नामाशिवाय जगणे हे मेल्यासारखेच आहे, असे वाटले पाहिजे. अक्षरशः जीव जाईपर्यंत, म्हणजे मीपणाने मरेपर्यंत नाम घेत सुटावे. शेवटी ' मी ' जातो आणि नाम शिल्लकच उरते. नाम घेऊन कधी पुरे होऊ शकत नाही. मुक्ती मिळाली की सर्व पुरे झाले असे म्हणतात, पण मुक्तीनंतरही जर काही कर्तव्य उरत असेल तर ते नामस्मरणच.

माणसाला गुंगीचे औषध दिले म्हणजे त्याला गुंगी आली की नाही हे पाहण्यासाठी अंक मोजायला सांगतात. अंक मोजता मोजता तो थांबला की, तो देहभानावर नाही असे ठरते. तसे, नाम घेता घेता 'मी नाम घेतो' हेही स्मरण जेव्हा राहात नाही, तेव्हाच त्या नामात रंगून गेलेल्या माणसाचे पर्यवसान 'एकान्तात' होते. एकान्त म्हणजे नाम घेणारा मी एक, ह्या एकाचाही अंत होणे,



म्हणजेच देहबुद्धीचा विसर पडणे, देहबुद्धीच्या पलीकडे जाणे. नाम घेता घेता अशी स्थिती प्राप्त झाली, म्हणजे त्याचे चित्त भगवंताकडे आहे की नाही असा प्रश्न करायला वावच कुठे राहतो ?

निद्रानाशाचा रोग झाला तर झोप लागेपर्यंत झोपेचे औषध आपण घेतो, तसे आपल्याला स्वाभाविक समाधान मिळेपर्यंत आपण नाम घेतले पाहिजे. नाम उपाधिरहित असल्याने आपणही उपाधिरहित झाल्याशिवाय नामाचे प्रेम आपल्याला येणार नाही. नामाने आनंदमय अशा भगवंताचे सान्निध्य लाभून त्याची कृपा व्हायला वेळ लागत नाही; किंबहुना, ज्याच्यावर भगवंताची कृपा होते त्याच्याच मुखात नाम येते. नामजपाची संख्या नोंद करून ठेवावी का ? अमुक एक संख्येपर्यंत जप करण्याचा संकल्प केला असेल, किंवा रोजचा काही कमीत कमी जप करण्याचे ठरविले असेल, तर जपसंख्येची नोंद करून ठेवणे जरूर आहे. जपाची सवय होण्याच्या दृष्टीने, आणि नेमाने काहीतरी किमान जप झाल्याशिवाय दिवस जाऊ नये या दृष्टीनेही, जपसंख्येची नोंद करावी. मात्र असे करताना एका बाबतीत खबरदारी घ्यावी; ती म्हणजे, आपली आजची नामसंख्या पुरी झाली, आता उद्यापर्यंत आपला आणि नामाचा काही संबंध नाही, अशा तऱ्हेची वृत्ती होण्याचा संभव असतो, त्याला जपावे; आणि नेमाची संख्या पुरी झाली तरी होईल तेवढे आणखी नाम घेण्याची सवय ठेवावी.

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
सोमवार, १३ नोव्हेंबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari




# आता याला थेट पंढरपूरचाच झेंडा उचलायला लावणार

## रुग्णालयात उपचार घेत असलेल्या मनोज जरांगे यांना रविवारी डिस्चार्ज

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मागील काही दिवसांपासून रुग्णालयात उपचार घेत असलेल्या मनोज जरांगे यांना रविवारी डिस्चार्ज मिळाला आहे. दरम्यान, रुग्णालयातून सुट्टी होताच जरांगे पुन्हा एकदा आंतरवाली सराटीकडे रवाना झाले. मात्र, याचवेळी त्यांचे ठिकठिकाणी स्वागत करण्यात आले. तर, डिस्चार्ज मिळाल्यावर आपल्या पहिल्याच सभेत त्यांनी जालना येथील एका राजकीय नेत्यावर हल्लाबोल केला आहे. जालन्यातील भोकरदन तालुक्यातील बोरगाव जहागीर गावात एका राजकीय नेत्याच्या कार्यकर्त्यांनी गावबंदीचे पोस्टर फाडून, मराठा तरुणांना मारहाण केल्याचा आरोप जरांगे यांनी केला आहे. त्यामुळे या नेत्याला आता थेट पंढरपूरचाच झेंडा उचलायला लावणार, असल्याचा खोचक टोला जरांगे यांनी लगावला आहे.

दरम्यान यावेळी बोलतांना जरांगे म्हणाले की, "आपल्या लेकरांच्या भविष्याचे बोर्ड आता फाडण्यात येत आहे. पण, त्याला माहितचं नाही मराठे किती एडपट आहे. आता जर पोस्टर फाडले तर आम्ही तुमचे कपडे फाडणार. तुला सुट्टी नाही आता भाऊ, यानंतर तू बोर्ड फाडू नको. मग तो भोकरदनचा कोणी का असू नयेत. भोकरदनच्या आपल्या एका भावाला मारहाण झाली. आम्ही जर एकदा मागे लागलो तर मग तो मंत्री असो, आमदार असो, माजी



आमदार असो किंवा तो कोणत्याही पक्षाचा असो. आमच्या लेकराच्या भविष्याचा पोस्टर फाडल्यास राज्यात एकही मराठ्याने त्याचा कार्यकर्ता राहायचा नाही, असे जरांगे म्हणाले.

पुढे बोलतांना जरांगे म्हणाले की, "आम्ही मतदान मागत नाही. आम्ही आमच्या लेकरांच्या शिक्षणासाठी आणि नोकऱ्यासाठी आरक्षण मागत आहोत. ते देण्यासाठी तुम्ही जर बॅनर फाडणार असाल, तर तुमच्यापेक्षा जास्त हाणामारी आम्हाला कळते. आम्ही बांधावरून दोन दोन दिवस रेटा-रेटी करतो. तू तर आमचं बॅनर फाडलं आहे. तुझं कार्यक्रमचं झालं समज, दिसेल तिथं तुझ्या गाडीचं टायर देखील काढून नेतील. आणखी तरी सांभाळून राहा. तुझं नाव जर समोर आलं, तर तुला बुक्का लावला समज. तुला थेट पंढरपूरचा झेंडा उचलण्याशिवाय दुसरं कामच ठेवणार नाही, असे जरांगे म्हणाले. संध्याकाळपर्यंत त्या नेत्याचं नाव घेणार आम्ही आमच्या आयुष्यासाठी आरक्षण मागत आहोत. जर याला तुम्ही विरोध करत असाल, तर याचा अर्थ असा होतो की, तुम्हाला आमचे लेकरं मोठे होऊ द्यायचे नाही. मग तुम्हाला आम्ही देखील मोठे होऊ देणार नाही. तुझ्या अंगावर मराठे आयुष्यभर गुलाल पडू देणार नाही. आपल्या लेकरांच्या आयुष्याचा प्रश्न आहे. भोकरदनमध्ये मराठा समाजाच्या तरुणांना कुणाच्या कार्यकर्त्यांनी मारलं, कोणी बॅनर फाडायला लावले त्याचं नावं पुढे येऊ द्या फक्त, तो वाळीतच पडला समजा. मी संध्याकाळपर्यंत त्या नेत्याचं नाव घेणार असल्याचे जरांगे म्हणाले आहे.



दोन वर्षांच्या प्रतीक्षेनंतर राज्यात दिवाळी उत्सव साजरा होत असून आधुनिक युगात वाडा आणि एकत्र कुटुंब संस्कृतीवर साचलेला अंधार दूर करण्यासाठी जेजुरी जयाद्री कन्या परिवाराच्या वतीने वाडे संस्कृती जोपासली जावी म्हणून पारंपरिक दिवाळी साजरी करण्यात आली. या वेळी पूजा कांबळे, माधुरी कापरे, राजश्री कांबळे यांच्यासह कु. ऋद्धी, सिद्धी, आरु, रुई, अनुष्का या चिमुरड्यांनीही सहभाग घेतला. छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे

# अहमदनगर-पुणे महामार्गावर भीषण अपघात

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** अहमदनगर-पुणे महामार्गावर भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. अहमदनगर-पुणे महामार्गावरील चास शिवारात ट्रॅव्हल्सने पिकअप वाहनात भीषण अपघात झाला. या अपघातात एकाच कुटुंबातील तिघांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. तर पिकअप वाहनातील अकरा जण जखमी झाले आहेत. जखमींवर अहमदनगरमधील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असून तर या घटनेने ऐन दिवाळीत कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. अहमदनगर-पुणे मार्गावर पहाटेच्या सुमारास ही घटना घडली. यात ट्रॅव्हल्सने पिकअप वाहनाला धडक दिली. यात दोन पुरुष व एक महिला यांचा जागीच मृत्यू झाला तर पिकअपमधील 11 जण जखमी झाले. दरम्यान या अपघातात प्रवीण गोरख कागदे, सारिका मच्छिंद्र कागदे, दीपक चव्हाण अशी मृतांची नावे आहेत. तर सुरज बजरंग कागदे, पिकअप चालक बजरंग शेषराव कागदे, धीरज मच्छिंद्र कागदे, मच्छिंद्र शेषराव कागदे, राहुल गोरख कागदे, सीता बजरंग कागदे, आरुषी मच्छिंद्र कागदे, आरती प्रवीण कागदे, आरती बजरंग कागदे, श्रुती मच्छिंद्र कागदे, धीरज राजाभाऊ जोगदंड अशी जखमींची नावे आहेत. काही जखमी हे बीड जिल्ह्यातील असून काही धाराशिव जिल्ह्यातील रहिवासी असल्याचे पोलिसांच्या माहितीतून समोर आले आहे.




# बिबट्याने केलेल्या हल्ल्यात मुलाचा जागीच मृत्यू

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** जिल्ह्यात ऐन दिवाळीत हृदयद्रावक घटना समोर आली आहे. दिंडोरी तालुक्यात बिबट्याच्या हल्ल्यात आठ वर्षीय मुलाला जीव गमवावा लागला आहे. हा मुलगा घराच्या ओट्यावर दिवाळीनिमित्त पणती लावत असताना बिबट्याने केलेल्या हल्ल्यात त्याचा जागीच मृत्यू झाला आहे. त्यामुळे ऐन दिवाळीत कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेने परिसरात दहशतीचे वातावरण तयार झाले आहे.

नाशिकसह जिल्ह्यात बिबट्याची दहशत कायम असून कालच पहाटेच्या सुमारास बिबट्याने एका मेंढपाळावर हल्ला केला होता. यात मेंढपाळ जखमी झाला होता. या घटनेचा तपास सुरूच होता की सायंकाळी साडे सातच्या सुमारास तालुक्यातील निळवंडी येथील एक आठ वर्षीय मुलावर बिबट्याने हल्ला केल्याची घटना घडली. या घटनेत बिबट्याने मुलाला परिसरातील उसाच्या शेतात नेत हल्ला चढविला. यात मुलाचा मृत्यू झाला आहे. दिवाळी सण सुरु असून हा मुलगा घराच्या दारातच पणती लावत असताना बिबट्याने हल्ला चढविला. घरच्यांना काही कळायच्या आत बिबट्याने मुलाला उसाच्या शेतात नेले. गुरु खंडू गवारी असे या मुलाचे नाव आहे.

## नार्वेकरांचे सूचक वक्तव्य

आधुनिक केसरी

मुंबईच्या कुलाबा कोळीवाडा येथे दिवाळीनिमित्त आयोजित एका कार्यक्रमाला विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर उपस्थित होते. नार्वेकरांनी स्थानिक नागरिकांबरोबर दिवाळी साजरी केली, तसेच राज्यातील जनतेला दिवाळीच्या शुभेच्छादेखील दिल्या. दरम्यान, त्यांनी यावेळी प्रसारमाध्यमाशी संवाद साधला. नार्वेकरांनी या संवादादरम्यान, दिवाळीच्या फटाक्यांसह राजकीय फटाक्यांवर भाष्य केले. विधानसभेचे अध्यक्ष म्हणाले, राजकीय फटाके सातत्याने फुटत असतात, परंतु आज आपण केवळ दिवाळीच्या फटाक्यांबद्दल बोलणं उचित राहील. कारण राजकीय फटाके फुटायला अजून वेळ आहे. सर्वोच्च न्यायालयाने राहुल नार्वेकर यांना शिवसेनेच्या आमदार अपात्रतेसंदर्भात सुनावणी घेऊन ३१ डिसेंबरपर्यंत निर्णय देण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे नार्वेकर यांना प्रसारमाध्यमांच्या प्रतिनिधींनी ३१ डिसेंबरच्या राजकीय फटक्यांबाबत प्रश्न विचारला. त्यावर नार्वेकर म्हणाले, तुम्ही त्याची काळजी करू नका, राजकीय फटाके फुटण्यास थोडा वेळ बाकी आहे. जनसामान्यांना अपेक्षित निर्णय होणं गरजेचे आहे. लोकशाहीत असे निर्णय होत असताना ते संवैधानिक चौकटीत व्हायला पाहिजेत. आमदार अपात्रतेच्या निर्णयाबाबत राहुल नार्वेकर म्हणाले, असे निर्णय शास्वत ठरायला हवेत. हे निर्णय टिकून कसे राहतील, याचा विचार करणं अपेक्षित आहे. आपले सरकार संवेदनशील आहे, विधीमंडळही संवेदनशील आहे. त्यामुळे येत्या काळात आपण एक शास्वत आणि टिकाऊ निर्णय घेऊ. त्याला विधीमंडळाची साथ मिळेल. राजकीयदृष्ट्या जनतेला न्याय मिळेल असा निर्णय होणे अपेक्षित आहे. त्यासाठी कायद्यात असणाऱ्या तरतुदी, संविधानातील तरतुदींचे पालन केले जाईल. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या गटातील २२ आमदारांनी'आपल्याला पक्षादेश (व्हीप) मिळालाच नव्हता, असा दावा विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांच्यापुढे झालेल्या सुनावणीत गुरुवारी केला. यासह अन्य काही मुद्द्यांवर कागदपत्रे, पुरावे आणि शपथपत्रे सादर करण्यासाठी पुन्हा १५ नोव्हेंबपर्यंत मुदत देण्यात आली असून आता २१ तारखेपासून सुनावणी घेण्यात येणार आहे. उद्धव ठाकरे आणि शिंदे गटाने सहकार्य केले, तरच सर्वोच्च न्यायालयाने घालून दिलेल्या ३१ डिसेंबरच्या कालमर्यादेत याचिकांवर निर्णय देता येईल, असे नार्वेकर यांनी स्पष्ट केले आहे.



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

## मी अविवेकाची काजळी। फेडूनि विवेकदीप उजळी ।

आधुनिक केसरी

**गुरुपौर्णिमेने महाराष्ट्रातील सण-उत्सवांना प्रारंभ होतो. नागपंचमी, बैलपोळा, गणेशोत्सव, जेष्ठागौरी आवाहन, दसरा आणि या सर्वच उत्सवांचा शेवट हा कार्तिक अमावश्येला दिपोत्सवाने म्हणजेच दीपावलीने होतो! जवळपास सर्व मराठी सणांची रेलचेल हि दिवाळी साजरी करून थंडावते. प्रत्येक सण हा काहीतरी प्रतिक म्हणून साजरा करतांना त्यामागील काही वैचारिक, सांस्कृतिक परंपरा समाजात रुजवण कार्य सृजन करत आले आहेत. गुरु पूजन, प्राणी पूजन, निसर्ग पूजन, शेती-मातीचे पूजन, आई-वडिलांचे पूजन आणि शेवटी सृष्टीतील अंधःकार नष्ट करून दीप पूजनाने 'प्रकाशोत्सव' म्हणजेच दिपावली साजरी केली जाते!**

सण, उत्सव, सोहळे करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, वैचारिक, आणि सामाजिक क्षेत्रामध्ये वारकरी सांप्रदाय सर्वत्र प्रवाही असून त्याच्या विचाराने येथील समाजमनामध्ये प्रबोधनाची नांगरणी करून वैचारिक बीज खोलवर रुजविण्याचे महत्कार्य केले आहे.

महाराष्ट्रातील संतांनी प्रत्येक सण-उत्सवाप्रमाणे दिपावली सणाचे महत्व सांगतांना प्रकाशरूपी ज्ञानाची दिवाळी प्रकट करण्याचे तेजोमय कार्य केले आहे. बदलत्या सामाजिक आणि वैचारिक परीपेक्षामध्ये अंधःकार निवारण्याचे, 'तीमिरातुनी तेजाकडे' मार्गक्रमण करण्याचे सर्वोत्तम साधन! षडविकारांची, अविवेकाची, निराशेची काजळी जर दूर करायची असेल तर ज्ञानरूपी पणती पेटवून असमंत नवविचारांनी उजळवून टाकावा लागेल! हाच दुर्दम्य आत्मविश्वास संतांनी येथील खेड्या-गावात राहणाऱ्या लोकांना माध्यमातून दिला! संतवाङ्मयामध्ये सर्वच संतांनी दिवाळीचे प्रतिक वापरून समाजातील अज्ञानरूपी अंधःकार घालविण्याचे कार्य केले. कार्तिक महिन्यामध्ये मंदिरांमध्ये काकडा-भजन रंगत असतांना संत येथील नारी-नरांना सहज उपदेश करीत तमोगुनांना घालविण्याचे महत्कार्य करतात. संतांचा वैचारिक दिव्यांचा सोज्वळ प्रकाश जर अंतःकरणामध्ये प्रविष्ट झाला तर साधकांचे जीवन तेजोमय विचारांनी प्रकाशमान होईल! माणूस आनंदाने नाचू-बागडू लागेल. म्हणूनच तत्कालीन समाज हा थोतांड-कर्मकांडाच्या चक्रव्युव्हामध्ये अडकलेला असतांना संत ज्ञानेश्वर माउली,

सुर्ये आधिष्ठीली प्राची | जगा जाणिव दे प्रकाशाची |
तैसी श्रोतया ज्ञानाची | दिवाळी करी ||

अशाप्रकारची ओवी लिहून आपल्या सैद्धांतिक आणि दृष्टांतिक सृजनत्वाचा अलौकिक अनुभवाविष्कार प्रकट करतात. सर्वसामान्य श्रोत्यांना आपले जीवन तेजोमय विचारांनी जर लखलखीत करायचे असेल तर त्यांनी सूर्योदयाच्या अगोदर प्रकट होणाऱ्या प्राची-प्रकाशाप्रमाणे आपल्या जीवनात मानवी देहाच्या नेणीवेची जाणीव ठेवून स्वःजीवन तेजोमय करावे. अविवेकरुपी षडरिपू जीवनातून निष्कशित करायचे असतील तर साधकाने सावधान असले पाहिजे. असे जर झाले तर माणसाच्या जीवनातील अंधार अदृश्य होईल, आणि मग निर्मळ हृदयकमल म्हणजेच अंतःकरण प्रकाशाने लख्ख होईल! अगदी 'उजेडी राहिले उजेड होऊन' प्रमाणे आंतर्बाह्य उजेडच उजेड ! आणि मग माऊली **मी अविवेकाची काजळी। फेडूनि विवेकदीप उजळी | तैं योगिया पाहें दिवाळी। निरंतर ||**

असे अत्युच्च विचार आणि जीवन सौंदर्य प्रकट करतात. मानवाचे जीवन जर अखंड तेजोमय, लखलखित व्हायचे असेल तर प्रत्येकाने आपल्या मनातील अविवेक समूळ नष्ट करून विवेकरुपी बीजांकुर रुजवले पाहिजेत. योगी पुरुषाप्रमाणे योगसाधनेद्वारे सप्तचक्र नियंत्रित करून निरंतर आनंदी राहतात. त्या प्रमाणे सामान्य मनुष्य स्वहृदयामध्ये विवेकदीप प्रज्वलित करून निरंतर आनंदी राहू शकतो. म्हणूनच या दिपोत्सव पर्वावर माणसाने अखंड जीवन ज्ञानाच्या तेजोमय दिपाने, आनंदाने ओतप्रोत भरून टाकावे. यासाठी ज्ञानोबाराय संपूर्ण विश्वात्मक देवतेला पसायदान मागतांना कोणतीही भौतिक गोष्ट मागत नाहीत.

दुरितांचे तिमीर जावो। विश्वस्वधर्म सूर्ये पाहो।

अज्ञानरुपी अंधःकाराने ग्रासलेल्या लोकांच्या जीवनातील अंधार नष्ट होऊन ज्ञानरुपी प्रकाशाने त्यांचे हृद्य तेजोमय व्हावे! ज्याला जे पाहिजे ते त्याला निरंतर मिळावे विश्व प्रार्थना माउली करतात. विश्वातील अज्ञान-अंधकार नष्ट व्हावा आणि प्रकाशरूपी ज्ञानोदय व्हावा हीच खरी दिवाळी! याशिवाय संत नामदेवराय ज्ञानाचा दीप घरोघरी उजळवतांना दिवाळीला पांडुरंगालाच घरी घेऊन येतात.

सण दिवाळीचा आला। नामा राऊळाशी गेला॥

भक्तीच्या बळावर संतांनी विठ्ठलाला चराचरात आणि जळी-स्थळी प्राप्त केले. याचा परिणाम म्हणजे वारकरी सांप्रदायाची आई संत जनाबाई जणू त्या सावळ्या विठूरायाला घरी बोलवायलाच सांगतात आणि त्यांच्या प्रेमाखातर देव जातो सुद्धा!

**आनंदाची दिवाळी। घरी बोलवा वनमाळी॥**

संतांची भक्तीची शक्ती त्यांनी समाजाला उपदेश करण्यासाठी खर्ची घातली. देवाला हृदयरूपी घरात कोंडून त्याला लिंबलोन करणारी हि संतमंडळी आणि त्यांचे विठ्ठलप्रेम, भक्ती अलौकिकच !

जगद्गुरू तुकोबाराय जगण्याची अखंड दिवाळीच दिवाळी कशी झाली ( ? ) याचं गोड चिंतन मांडतात.

**साधू संत येती घरा। तोची दिवाळी दसरा ॥**



दिवाळी संत वर्षभर साजरी करत असतात. संतांना ज्ञानाचा परीसस्पर्श झाल्यामुळे रोजच दिवाळी! संत ज्ञान, विचार आणि वचनांच्या मार्गाने मार्गस्थ झाले असता चंदनाने बोरी सुद्धा व्यापून टाकल्या आणि विषारी नकारात्मक विचारांचे काटे अदृश्य होऊन त्याचं जीवन अंतर्बाह्य निर्मळ चंदन झालं. नितांत सुंदर झालं ! संतांच्या अजरामर ज्ञान-वचनांची अमोघ दिवाळी पहिली असता भौतिक आनंदोत्सवाबरोबरच आंतरिक ज्ञानानंद हा अलौकिक, अवीट, अतिगोड असल्याचा प्रत्यय येतो. ज्ञानोबा, संत नामदेव, संत जनाबाई, तुकोबा संतांच्या वचनांचा, आव्हानात्मक जीवनाचा थोडक्यात विचार केल्यास आपले जीवन क्षणार्धात बदलून जाईल. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई या चारही भावडांना समाजाने समाजबाह्य केले. कुणी झोळीत पीठ वाढणे तर सोडाच साधं फुटकं खापर सुद्धा दिलं नाही. सर्वत्र जगण्याची अवहेलना, आई-वडिलाचे देहांत प्रायश्चित! तरीही येथील नतदृष्ट, कुजलेल्या विचारांच्या लोकांशी दोन हात करत प्रतीकाराशिवाय आपले जीवन नितांत सुंदर बनवले. आनंदाची आणि ज्ञानाची दिवाळी साजरी केली. अत्यंत खडतर जगण्याचा उत्सव साजरा करून हरिपाठ, ज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी आणि अमृतानुभव सारखे अलौकिक, ज्ञान आणि जीवनाच्या तत्वज्ञानाने ओतप्रोत भरलेले ग्रंथ जगाला दिले. तुकोबांचे जीवन यापेक्षाही खडतर ! प्रचंड दुष्काळ, संसार भंगला, पाटील कोपला, धर्ममार्तंडांनी काठ्यांनी मारलं. लिहलेले अभंग पाण्यात बुडवले. आई-वडील, बायको, मुलगा, गुरे-ढोरे पटापटा मेली. काय खावे, कुणीकडे जावे? अनंत प्रश्नांनी जीवन वेढलेले असतांना तुकोबा मात्र डगमगले नाहीत. त्यांनी अभंग, भजन, कीर्तन, टाळ, वीणा सोडला नाही! आपला भोवताल आनंदाचे डोही आनंद तरंग करून आसमंत उजळवून टाकला! आनंदाचे तरंग प्रत्येकाच्या अंतरंगात रुजविले ! जीवन कृतार्थ झालं! माय-बापहो, आजच्या या धकाधकीच्या काळात आपण संत विचारांची कास धरली पाहिजे. केवळ बोलून चालणार नाही तर आपल्या भोवताल एखादी न पेटनारी चूल पेटवण्याचे काम करावे लागेल. रंजल्या-गांजल्याच्या सवेतच ईश्वर अस्तित्व आहे. दुःखीताचे अश्रू पुसून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याएव्हढे दुसरे पुण्य नाही! आपल्या भोवताल आनंद, निरोग, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, सहृदयता प्रसारित करणे हीच खरी संत विचारांची दिवाळी! तेंव्हा प्रत्येकाने 'वसुधैव कुटुंबकम' या विश्वधर्माचे, संतविचारांचे पाईकपण अंगी बाणवून रंजल्या-गांजल्यांना हसतं-खेळतं करत, मदत करून त्यांच्या जीवनातील एक क्षण जरी आनंदाने फुलवता आला, त्यांच्या जीवनातील किंचित तिमिर घालवून तेजोमय आनंद फुलविता येणे म्हणजेच खरी संत विचारांची दिवाळी साजरी करणे होय! सर्वांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा!



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

## दुर्जनांच्या संगतीमध्ये कधीच उत्कर्ष घडत नाही

आधुनिक केसरी

**दुर्जनांची संगती कधीचं उत्कर्ष घडवत नाही. तर सज्जनांची संगती कधीचं व्यर्थ जात नाही.जीवनात झालेली प्रगती अथवा अधोगती याला प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रित्या आपण निर्माण केलेली संगती हिच जबाबदार असते. जीवन घडण्यासाठी अथवा बिघडण्यासाठी संगतीचा प्रभाव अथवा अभाव हा निश्चितच परिणाम कारक असतो. जीवनात संगती शिवाय जवळपास पर्याय नसतोच. म्हणून कुसंगती केली तर आपलं हित होणार नाही. या उलट जर आपल्यला सुसंगत लाभली तर आपलं काही तरी हित निश्चित होईल आणि हित झालं नाही तर अहित मात्र नक्कीच होणार नाही. सुसंगत लाभदायक ठरते तर कुसुंगत जीवनात अनेक समस्या निर्माण करते. जीवनातील हित अहित यांचं मुळ सहवास संगती असते.**

आपण कोणाच्या सहवासात आहेत त्यावर आपलं अंतिम यश ठरत असतं.सध्या सोशल माध्यमांच युग आहे त्या मुळे संगती देखिल हवा हवाईच आहे आणि त्याचे काहि चांगले परिणाम असतीलही पण घातकच परिणाम जास्त आहेत हे वास्तव कोणालाही नाकारता येणार नाही.या हवा हवाई संगतीचा परिणाम म्हणून जीवनात तण तणाव देखिल वाढत आहे.नैराश्य निर्माण होण्यासाठी चुकीची संगती कारणीभूत ठरत असल्याने आपलं जीवन प्रभावीत होऊ देयच नसेल तर चुकलेली संगती तात्काळ सुधारता आली पाहिजे.पण आपण मात्र तसं न करता त्याच चक्रव्युहात अडकून पडतो.परिणामी मनातील अस्थिरता संपुष्टात येत नाही मग अस्थिरता संपुष्टात येण्याच्या दृष्टीने आपण पुन्हा नवी संगती शोधतो पण अशा वेळी पुन्हा योग्य संगती लाभली तर हित होत होईल आणि संगती चुकली तर अहिताला सामोरं जावं लागतं. जीवनातील कोणाताही निर्णय घेत असतांना आपण परिपूर्ण विचार करणं खुप महत्वाच आणि गरजेच आहे.यावरच आपलं बहुतांश जीवन अवलंबून असत.प्रत्येकाच जीवना बदलच मत भुमिका हि वेगवेगळी असते. आपल्या सहवासाचा संगतीचा कळत न कळत आपल्यावर प्रभाव निर्माण होऊन आपण देखिल तसेच घडत असतो.म्हणून प्रभाव हा खुप भयानक असतो तो चांगला झाला तर हित करतो आणि वाईट झाला तर अहित करतो.आपला जीवन उद्देश भरकटु देयाचा नसेल तर योग्य संगत असली पाहिजे.चुकीची संगती लाभली तर मग मात्र आपण ध्येयापासून भरकटले जाऊ शकतो. याची जाणीव ठेवली तर आपल्या जीवनात अपयश, नैराश्य याच आगमन कधीच होणार नाही. कुठल्याही व्यक्ती च्या विचाराच्या संपर्कात जातांना स्वतःचा विवेकाचा वापरा केलाच पाहिजे.जेणेकरून आपण आपल्या ध्येयापासून भरकटणार नाही. याची परिपूर्ण दक्षता घेणं अत्यंत आवश्यक असतं.संगती बाबतचा निर्णय चुकल्याने अनेकांचं जीवन प्रभावीत होऊन संपुष्टात आल्याचे आपण पहातो.जीवनात संगत चुकली की माणुस तिथेच संपला हे जवळपास निर्धारित असतं.संगत म्हणजे नैसर्गिक नातेसंबंधा या व्यतिरिक्त आपण आपल्या जीवनातील विविध कारणांमुळे निर्माण केलेली घनिष्ठता होय. हि घनिष्ठ ता सात्विक, मिळाली तर हित होईल.चांगले मित्र आयुष्यात मिळणे हे अत्यंत महत्वाचे आहे .सुसंगती हि वेगवेगळ्या व्यसना पासुन दुर ठेवते त्याच बरोबर आचारविचार देखील शुद्ध ठेवते.सुसंगती हि अपयशावर सुद्धा विजय मिळवू शकते.एवढी प्रचंड मोठी सकारात्मक शक्ति ही सुसंगती मध्ये असते.सुसंगती हि यशस्वी जीवनाची शिल्पकार आहे असुन जिवनात चुकीची संगती लाभू नये म्हणून जीवनाला अध्यात्मिक ज्ञान शक्तीची जोड असली पाहिजे.जीवन मार्गक्रमण करत असताना असताना न्याय,निती,धर्म समजला तर चुकुन सुद्धा हातुन वाईट कर्म घडत नाही.आपल्यापासून इतरांना त्रास होणार नाही याचा विचार क्षणोक्षणी केला तर आपण चुकीच्या मार्गावर धावत नाहीत जग जिंकता येत पण मन जिंकता आले पाहिजे आपलं मन आपल्या नियंत्रणात असेल तर आपली संगती चुकत नाही.जिवनात समाधान मिळेल,शांती मिळेल आणि समाधानकारक अवस्थेत झोप येईल अशा पद्धतीने आपलं जीवन राहण्यासाठी आपला सहवास हा योग्य पद्धतीचा असला पाहिजे.चुकीच्या लोकांशी झालेली संगती सहवास हा पश्चातापास कारण होवून नैराश्यामध्ये जाण्यास भाग पाडत असतो.त्या अनुषंगाने आपण सचेत असले पाहिजे. नैसर्गिक नाते संबंध बदलता येत नाहीत पण आपण निर्माण केलेले नाते संबंध मैत्री हि सुसंगत हितकारक असली पाहिजे.ज्ञानाची संगती हि जीवनातील सगळ्यात उत्कृष्ट संगती आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739




# हे दिव्या

हे दिव्या...
उजळून टाक
ईथलं प्रत्येकाच घर....
जे पिढ्यानपिढ्या काळोखाच्या
आडोशाला गरीबीची जीन जगत होतं...
हे दिव्या तुझ्या समृद्धीच्या उजेडानं
ईथला काळाकुट्ट अंधार कायमचा दूर कर...
आणि हो...
तुझ्याजवळ कसला रे भेद
गरिब आणि श्रीमंतीचा...
तुझा समतेचा प्रकाश तर सर्वांसाठी समाणच...
हे दिव्या...
इथे प्रत्येकाच्या मनात
स्वार्थ, लोभ आणि परकेपणाचा
अंधार फार दाटीवाटीने भरला आहे रे...
त्या अंधारावर तु कायमच पांघरूण घाल...
आणि नितळ शुद्ध खळखळ
वाहणाऱ्या झऱ्यासमान त्यांना प्रवाहित कर....
हे दिव्या...
श्रीमंताचे बंगले तु मोठ्या
रोषनाईने सजवलेत ...
त्यांच्या घरात आणि दारात सुखा
समाधानाचं पिक भरभरून आलंय...
पण कायम भुकेनं पिचलेल्या,
पोट पाठीला टेकलेल्या... गरिबाच्या
झोपडीतही उजेडाचा सुर्य घेवून चल...
हे दिव्या...
रेल्वेस्टेशन, बस स्टँड  हे भिकाऱ्यांच
कायम आश्रयस्थान...
आज त्यांना गोडधोड खायला दे...
त्यांच्या  भूकीचा तु कायम
साक्षीदार राहिला आहेस...
त्यांना आज पोटभर जेवण दे...!
हे दिव्या...
आज इथं माणसातली
माणूसकी आटत चालली...
मायेची ममताही  फाटत चालली
आणि या लोकांची सारी जींदगी अजूनही
माझं-माझं करण्यातच गेली...
तु प्रेम आणि मैत्री भावणेची ज्योत
त्यांच्या अंतःकरणात पेटवं...
हे दिव्या...
आज  दिवाळी आहे.
तु एक काम कर.
तु माणवतेचा दूत बनून लहान-मोठा,
गरिब-श्रीमंत असा भेद न करता
प्रत्येकाच्या घरी जा,,,
आणि समतेचा,ममतेचा आणि माणवतेचा दिवा पेटवं...
आणि मग बघ त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद...
तू त्या आनंदाचा साक्षीदार हो
आणि त्यांच्या आनंदात तू सुद्धा सामिल हो....

**सागरकुमार झनके**
गौलखेड, जळगाव जा,9822572244



महाराष्ट्र Business Katta




अर्जंट पाहिजेत
बँक ऑफिससाठी महिला (कॉम्प्युटरचे ज्ञान आवश्यक), अनुभवी सुपरवायजर, मार्केटिंग प्रतिनीधी (स्वत:ची टू-व्हीलर आवश्यक) आणि अनुभवी सेक्युरिटी गार्ड पाहिजे.
संपर्क - 9822982958






# मी अविवेकाची काजळी। फेडूनि विवेकदीप उजळी |



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**गुरुपौर्णिमेने महाराष्ट्रातील सण-उत्सवांना प्रारंभ होतो. नागपंचमी, बैलपोळा, गणेशोत्सव, जेष्ठागौरी आवाहन, दसरा आणि या सर्वच उत्सवांचा शेवट हा कार्तिक अमावश्येला दिपोत्सवाने म्हणजेच दीपावलीने होतो! जवळपास सर्व मराठी सणांची रेलचेल हि दिवाळी साजरी करून थंडावते. प्रत्येक सण हा काहीतरी प्रतिक म्हणून साजरा करतांना त्यामागील काही वैचारिक, सांस्कृतिक परंपरा समाजात रुजवण कार्य सृजन करत आले आहेत. गुरु पूजन, प्राणी पूजन, निसर्ग पूजन, शेती-मातीचे पूजन, आई-वडिलांचे पूजन आणि शेवटी सृष्टीतील अंधःकार नष्ट करून दीप पूजनाने 'प्रकाशोत्सव' म्हणजेच दिपावली साजरी केली जाते! सण, उत्सव, सोहळे करण्याच्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, वैचारिक, आणि सामाजिक क्षेत्रामध्ये वारकरी सांप्रदाय सर्वत्र प्रवाही असून त्याच्या विचाराने येथील समाजमनामध्ये प्रबोधनाची**

महाराष्ट्रातील संतांनी प्रत्येक सण-उत्सवाप्रमाणे दिपावली सणाचे महत्व सांगतांना प्रकाशरूपी ज्ञानाची दिवाळी प्रकट करण्याचे तेजोमय कार्य केले आहे. बदलत्या सामाजिक आणि वैचारिक परीपेक्षामध्ये अंधःकार निवारण्याचे, 'तीमिरातुनी तेजाकडे' मार्गक्रमण करण्याचे सर्वोत्तम साधन! षडविकारांची, अविवेकाची, निराशेची काजळी जर दूर करायची असेल तर ज्ञानरूपी पणती पेटवून असमंत नवविचारांनी उजळवून टाकावा लागेल! हाच दुर्दम्य आत्मविश्वास संतांनी येथील खेड्या-गावात राहणाऱ्या लोकांना माध्यमातून दिला! संत वाङ्मयामध्ये सर्वच संतांनी दिवाळीचे प्रतिक वापरून समाजातील अज्ञानरूपी अंधःकार घालविण्याचे कार्य केले. कार्तिक महिन्यामध्ये मंदिरांमध्ये काकडा-भजन रंगत असतांना संत येथील नारी-नरांना सहज उपदेश करीत तमोगुनांना घालविण्याचे महत्कार्य करतात. संतांचा वैचारिक दिव्यांचा सोज्वळ प्रकाश जर अंतःकरणामध्ये प्रविष्ट झाला तर साधकांचे जीवन तेजोमय विचारांनी प्रकाशमान होईल! माणूस आनंदाने नाचू-बागडू लागेल. म्हणूनच तत्कालीन समाज हा थोतांड-कर्मकांडाच्या चक्रव्युव्हामध्ये अडकलेला असतांना संत ज्ञानेश्वर माउली,

**सुर्ये आधिष्ठीली प्राची | जगा जाणिव दे प्रकाशाची | तैसी श्रोतया ज्ञानाची | दिवाळी करी ||**

**तुकारामनीती**
**भाग -७२**

अशाप्रकारची ओवी लिहून आपल्या सैद्धांतिक आणि दृष्टांतिक सृजनत्वाचा अलौकिक अनुभवाविष्कार प्रकट करतात. सर्वसामान्य श्रोत्यांना आपले जीवन तेजोमय विचारांनी जर लखलखीत करायचे असेल तर त्यांनी सूर्योदयाच्या अगोदर प्रकट होणाऱ्या प्राची-प्रकाशाप्रमाणे आपल्या जीवनात मानवी देहाच्या नेणीवेची जाणीव ठेवून स्वःजीवन तेजोमय करावे. अविवेकरुपी षडरिपू जीवनातून निष्कशित करायचे असतील तर साधकाने सावधान असले पाहिजे. असे जर झाले तर माणसाच्या जीवनातील अंधार अदृश्य होईल, आणि मग निर्मळ हृदयकमल म्हणजेच अंतःकरण प्रकाशाने लख्ख होईल! अगदी 'उजेडी राहिले उजेड होऊन' प्रमाणे आंतर्बाह्य उजेडच उजेड ! आणि मग माऊली

**मी अविवेकाची काजळी। फेडूनि विवेकदीप उजळी |**
**तैं योगिया पाहें दिवाळी। निरंतर ||**

असे अत्युच्च विचार आणि जीवन सौंदर्य प्रकट करतात. मानवाचे जीवन जर अखंड तेजोमय, लखलखित व्हायचे असेल तर प्रत्येकाने आपल्या मनातील अविवेक समूळ नष्ट करून विवेकरुपी बीजांकुर रुजवले पाहिजेत. योगी पुरुषाप्रमाणे योगसाधनेद्वारे सप्तचक्र नियंत्रित करून निरंतर आनंदी राहतात. त्या प्रमाणे सामान्य मनुष्य स्वहृदयामध्ये विवेकदीप प्रज्वलित करून निरंतर आनंदी राहू शकतो. म्हणूनच या दिपोत्सव पर्वावर माणसाने अखंड जीवन ज्ञानाच्या तेजोमय दिपाने, आनंदाने ओतप्रोत भरून टाकावे. यासाठी ज्ञानोबाराय संपूर्ण विश्वात्मक देवतेला पसायदान मागतांना कोणतीही भौतिक गोष्ट मागत नाहीत. दुरितांचे तिमीर जावो। विश्वस्वधर्म सूर्ये पाहो। अज्ञानरुपी अंधःकाराने ग्रासलेल्या लोकांच्या जीवनातील अंधार नष्ट होऊन ज्ञानरुपी प्रकाशाने त्यांचे हृद्य तेजोमय व्हावे! ज्याला जे पाहिजे ते त्याला निरंतर मिळावे विश्व प्रार्थना माउली करतात. विश्वातील अज्ञान-अंधकार नष्ट व्हावा आणि प्रकाशरूपी ज्ञानोदय व्हावा हीच खरी दिवाळी! याशिवाय संत नामदेवराय ज्ञानाचा दीप घरोघरी उजळवतांना दिवाळीला पांडुरंगालाच घरी घेऊन येतात.

सण दिवाळीचा आला। नामा राऊळाशी गेला॥ भक्तीच्या बळावर संतांनी विठ्ठलाला चराचरात आणि जळी-स्थळी प्राप्त केले. याचा परिणाम म्हणजे वारकरी सांप्रदायाची आई संत जनाबाई जणू त्या सावळ्या विठूरायाला घरी बोलवायलाच सांगतात आणि त्यांच्या प्रेमाखातर देव जातो सुद्धा! आनंदाची दिवाळी। घरी बोलवा वनमाळी॥ संतांची भक्तीची शक्ती त्यांनी समाजाला उपदेश करण्यासाठी खर्ची घातली. देवाला हृदयरूपी घरात कोंडून त्याला लिंबलोन करणारी हि संतमंडळी आणि त्यांचे विठ्ठलप्रेम, भक्ती अलौकिकच ! जगद्गुरू तुकोबाराय जगण्याची अखंड दिवाळीच दिवाळी कशी झाली( ?) याचं गोड चिंतन मांडतात.

**साधू संत येती घरा। तोची दिवाळी दसरा ॥**

दिवाळी संत वर्षभर साजरी करत असतात. संतांना ज्ञानाचा परीसस्पर्श झाल्यामुळे रोजच दिवाळी! संत ज्ञान, विचार आणि



वचनांच्या मार्गाने मार्गस्थ झाले असता चंदनाने बोरी सुद्धा व्यापून टाकल्या आणि विषारी नकारात्मक विचारांचे काटे अदृश्य होऊन त्याचं जीवन अंतर्बाह्य निर्मळ चंदन झालं. नितांत सुंदर झालं ! संतांच्या अजरामर ज्ञान-वचनांची अमोघ दिवाळी पहिली असता भौतिक आनंदोत्सवाबरोबरच आंतरिक ज्ञानानंद हा अलौकिक, अवीट, अतिगोड असल्याचा प्रत्यय येतो. ज्ञानोबा, संत नामदेव, संत जनाबाई, तुकोबा संतांच्या वचनांचा, आव्हानात्मक जीवनाचा थोडक्यात विचार केल्यास आपले जीवन क्षणार्धात बदलून जाईल. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान आणि मुक्ताबाई या चारही भावडांना समाजाने समाजबाह्य केले. कुणी झोळीत पीठ वाढणे तर सोडाच साधं फुटकं खापर सुद्धा दिलं नाही. सर्वत्र जगण्याची अवहेलना, आई-वडिलाचे देहांत प्रायश्चित! तरीही येथील नतदृष्ट, कुजलेल्या विचारांच्या लोकांशी दोन हात करत प्रतीकाराशिवाय आपले जीवन नितांत सुंदर बनवले. आनंदाची आणि ज्ञानाची दिवाळी साजरी केली. अत्यंत खडतर जगण्याचा उत्सव साजरा करून हरिपाठ, ज्ञानेश्वरी, चांगदेव पासष्टी आणि अमृतानुभव सारखे अलौकिक, ज्ञान आणि जीवनाच्या तत्वज्ञानाने ओतप्रोत भरलेले ग्रंथ जगाला दिले. तुकोबांचे जीवन यापेक्षाही खडतर ! प्रचंड दुष्काळ, संसार भंगला, पाटील कोपला, धर्ममार्तंडांनी काठ्यांनी मारलं. लिहलेले अभंग पाण्यात बुडवले. आई-वडील, बायको, मुलगा, गुरे-ढोरे पटापटा मेली. काय खावे, कुणीकडे जावे? अनंत प्रश्नांनी जीवन वेढलेले असतांना तुकोबा मात्र डगमगले नाहीत. त्यांनी अभंग, भजन, कीर्तन, टाळ, वीणा सोडला नाही! आपला भोवताल आनंदाचे डोही आनंद तरंग करून आसमंत उजळवून टाकला! आनंदाचे तरंग प्रत्येकाच्या अंतरंगात रुजविले ! जीवन कृतार्थ झालं! माय-बापहो, आजच्या या धकाधकीच्या काळात आपण संत विचारांची कास धरली पाहिजे. केवळ बोलून चालणार नाही तर आपल्या भोवताल एखादी न पेटनारी चूल पेटवण्याचे काम करावे लागेल. रंजल्या-गांजल्याच्या सवेतच ईश्वर अस्तित्व आहे. दुःखीताचे अश्रू पुसून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्याएव्हढे दुसरे पुण्य नाही! आपल्या भोवताल आनंद, निरोग, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी, सहृदयता प्रसारित करणे हीच खरी संत विचारांची दिवाळी! तेंव्हा प्रत्येकाने 'वसुधैव कुटुंबकम' या विश्वधर्माचे, संतविचारांचे पाईकपण अंगी बाणवून रंजल्या-गांजल्यांना हसतं-खेळतं करत, मदत करून त्यांच्या जीवनातील एक क्षण जरी आनंदाने फुलवता आला, त्यांच्या जीवनातील किंचित तिमिर घालवून तेजोमय आनंद फुलविता येणे म्हणजेच खरी संत विचारांची दिवाळी साजरी करणे होय!

# पाडेगावचे दानशूर व्यक्तिमत्त्व : कै. अण्णा बाबुराव धायगुडे

आधुनिक केसरी

**आमचे वडील कै.अण्णा बाबुराव धायगुडे यांचे दिनांक १ नोव्हेंबर २०२३ रोजी निधन झाले. त्यांच्या जाण्याने जणू आमच्या कुटूंबावर एक मोठा आघात झाला.आमच्या कुटूंबाचा आधार म्हणून आम्ही त्यांच्याकडे कायम पाहत आलेलो आहे.परंतु त्यांच्या जाण्याने आमच्या घरात एक मोठी पोकळी निर्माण झालेली आहे. त्यांनी त्यांच्या काळात समाजासाठी केलेले कार्य आजही लोकांच्या स्मरणात आहे. लोकांकडून त्या आठवणी सांगितल्या जात आहेत. खंडाळा तालुक्यातील पाडेगावच्या मातीत सरपंच म्हणून असताना सुद्धा आण्णांनी विकासक दृष्टिकोन ठेवून गावची कामे केली.**

आज ही त्यांच्या कारकीर्दीबद्दल बोलले जात असताना आण्णांच्या अंगी असलेल्या दानशूरपणाचं कर्तृत्व विसरता येणार नाही. लोकांच्या प्रगतीसाठी किंवा समाजाच्या हिताच्या दृष्टीने ते आयुष्यभर काम करत राहिले. आण्णांनी चुलते तुकाराम सदोबा धायगुडे यांच्या पावलावर पाऊल ठेवून समाजकार्यामध्ये आले. ते पाडेगावचे सरपंच होते.तसेच त्यांनी त्यांच्या काळामध्ये सामाजिक बांधिलकी जपत गावच्या भल्यासाठी विहिरीसाठी जागा दिल्या.गावाला पाच एकर इतकी गावठाण जमीन त्यांनी दिली. तसेच ग्रामपंचायतीला इमारत नव्हती.त्यावेळी त्यांनी स्वतःची खोली दिली.त्यांच्याच विचारांचा वारसा घेऊन आमचे वडील आण्णा धायगुडे हे पाच वर्ष सरपंच झाले.तसेच एक वर्ष प्रशासक म्हणून त्यांनी काम केलं.काम करत असताना त्यांनी समाजातील गोरगरिबांना शिक्षणाचे दरवाजे खुले व्हावेत.त्यांना आपल्या परिसरात शिक्षण घेता यावे.म्हणून समता आश्रम शाळेस पाच एकर गावच्या गावठाणातील जागा ७५ वर्षाच्या करारावर दिली. आज शाळेमध्ये दोन हजार पेक्षा जास्त मुले मुली शिक्षण घेत आहेत. कित्येक मुले मुली घडून चांगल्या नोकरीवर विराजमान झालेली आहेत. पचांडे वस्तीवर त्यांनी लाईट व बोरवेल मारून



हातपंप बसवला तसेच काही गावातील गोरगरिबांना राहण्यासाठी बरेच वर्षे जागा देऊन काही कुटुंबाला त्यांच्या हक्काचे घर होईपर्यंत राहून दिले.हे सर्व त्यांनी विनामूल्य दिले. गावातील जाधव कुटुंबातील काही लोकांना ग्रामपंचायत मध्ये घेऊन गव्हर्मेंट मध्ये त्यांची बदलीसाठी अर्ज केले. गोरगरिबांसाठी गावठाणमधील प्लॉटिंग पाडून सर्व लोकांना दीडशे रुपयांमध्ये प्लॉट त्यांनी दिले. गावातील प्रत्येक कुटूंबांचा विकास घडवून आणणे म्हणजेच गावचा विकास घडवून आणणे.हा दृष्टिकोन त्यांनी बाळगला.एका कुटुंबाला गुऱ्हाळासाठी जागा सुद्धा त्यांनी दिली.

बाळूपाटलाची वाडीसाठी आण्णांचे चुलते तुकाराम सदोबा धायगुडे यांनी स्वतःची जागा विहिरीसाठी दिली.विविध क्षेत्रांमध्ये ज्या ज्यावेळी गरजू लोक येत असत.त्या प्रत्येक वेळी त्यांनी त्यांना मदत केली.नोकरीमध्ये,व्यवसायामध्ये तसेच जगदाळे कुटुंबामध्ये असणारे त्यांच्या आई वारल्यानंतर त्यातील एका मुलाला दहावीपर्यंत शिक्षण शिकवले.गोरगरिबांच्या मुलांसाठी नातेवाईकांच्या मुलांसाठी सतत शिक्षणाची दरवाजे त्यांनी खुले ठेवले.शिकवण्याचा त्यांनी प्रयत्न केला.काही लोकं उच्च शिक्षण घेऊन,आज चांगल्या परिस्थितीमध्ये राहत आहेत.वेळोवेळी त्यांनी रोजगार उपलब्ध होण्यासाठी मित्रांना स्वतःच्या जमिनीवर कर्ज काढून त्यांना व जामीन होऊन त्यांना व्यवसायासाठी निधी उपलब्ध करून दिला.सर्व समाजातील बांधवांच्या हितासाठी त्यांनी ज्या त्या वेळी जे जे निर्णय योग्य होते ते ते त्यांनी घेतले. आण्णांनी सरपंच असताना उद्योग समूहाला गती दिली. विकासाच्या दृष्टीने नेण्यासाठी त्यांनी ग्रामपंचायत मधून सर्वप्रथम नवले उद्योग समूहासाठी नळाचे कनेक्शन दिले. गावामध्ये रेशन चालू करण्यासाठी एक जणास ना हरकत देऊन विकासाचे काम करण्यास चालना दिली.विविध क्षेत्रात आण्णांनी त्यांच्या कारकीर्दीत उल्लेखनीय अशीच कामगिरी केली.त्यांचे आज हृदयविकाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात आम्ही दोन मुले,पाच नातवंडे,चार चुलते,दोन बहिणी,सात चुलत भाऊ असा कुटुंब परिवार आहे.परंतु आमच्या आण्णांच्या कार्यामुळे लोकांचे आमच्या कुटूंबाशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत.सातारा जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती असोत किंवा स्वर्गीय अविनाश धायगुडे पाटील असो यांच्या समवेत ही त्यांचे वैचारिक मंथन घडायचे.ज्यावेळी आनंदराव शेळके पाटील पहिल्यांदा जिल्हा परिषद सदस्य झाले.त्यावेळी त्यांना सर्वप्रथम लोक वर्गणीतून जिप्सी गाडी चावी पाडेगाव या ठिकाणी दिली. स्वर्गीय अविनाश धायगुडे पाटील हे आण्णांचे जिवलग मित्र होते. एकत्र येऊन समाजासाठी त्यांनी लोक कल्याणासाठी अनेक कामे केली.पाडेगाव या ठिकाणी रामराजे नाईक निंबाळकर यांना विरोध असताना सुद्धा त्यांची प्रथम पाडेगाव या ठिकाणी ग्रामसभा घेऊन पाडेगाव जनतेमध्ये विश्वास देऊन व विकास कामे करून घेतली.लोकांमध्ये विकासाच्या दृष्टीने जे काही देता येईल ते देण्याचा प्रयत्न आण्णांनी त्यांच्या कार्यातून व त्यांच्या दानशूर पणातून केलेला आहे.आम्ही आण्णांचा सामाजिक कार्याचा वारसा हा पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न करणार आहोत.

आण्णांना भावपूर्ण श्रद्धांजली...

**दादासो आण्णा धायगुडे**
पाडेगांव ता.खंडाळा जि.सातारा
संपर्क क्रमांक-९५०३२२०८०१

# विश्वविजयापासून भारत दोन पावले दूर

आधुनिक केसरी

भारतात चालू असलेली एकदिवसीय विश्वचषक स्पर्धा अंतिम टप्प्यात आली असून स्पर्धेतील सर्वोत्तम चार संघ उपांत्य फेरीत पोहचले आहेत. अपेक्षेप्रमाणे यजमान भारताने या स्पर्धेत चमकदार कामगिरी करत सर्वात आधी उपांत्य फेरी गाठली. भारताने खेळलेल्या सर्वच सर्व सामन्यात विजय मिळवत गुण तालीक्यात प्रथम क्रमांक पटकावत सर्वात आधी उपांत्य फेरीचे तिकीट बुक केले. भारता प्रमाणेच दक्षिण आफ्रिकेने देखील चांगली कामगिरी करत उपांत्य फेरी गाठली. पाच वेळेचा विजेत्या ऑस्ट्रेलियाने सुरवातीचे दोन गमावले नंतर मात्र सलग सात सामने जिंकत उपांत्य फेरीत दिमाखात प्रवेश केला. उपांत्य फेरीचा चौथा संघ कोण हे पाहण्यासाठी मात्र क्रिकेटप्रेमींना धीर धरावा लागला कारण न्युझीलंड, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान हे तीन संघ त्या शर्यतीत होते. अखेर न्यूझीलंडने ही शर्यत जिंकली आणि उपांत्य फेरी गाठली. आता १५ तारखेला भारताचा आणि न्यूझीलंडचा पहिला उपांत्य सामना मुंबईच्या वानखेडे स्टेडियमवर रंगेल तर १६ तारखेला दक्षिण आफ्रिका व ऑस्ट्रेलिया यांच्यात दुसरा उपांत्य सामना कोलकोत्याच्या इडन गार्डन मैदानावर होईल. दोन्ही सामन्यातील विजेते १९ तारखेला अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर विश्व विजयासाठी समोरासमोर येतील. भारताने या स्पर्धेत चमकदार कामगिरी करत दिमाखात उपांत्य फेरी गाठली आहे. या स्पर्धेतील एकमेव अजिंक्य संघ भारत आहे. या स्पर्धेत एकाही संघाला भारताला नमवण्यात यश आले नाही. विशेष म्हणजे भारताने जिंकलेले सर्वच्या सर्व सामने एकतर्फी जिंकले आहेत. प्रतिस्पर्धी संघाला भारताने जराही संधी दिली नाही. गोलंदाजी, फलंदाजी, आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारताने एकहाती वर्चस्व गाजवले आहे. भारताचे सर्व फलंदाज जबरदस्त फॉर्मात आहे. रोहित, विराट, गील, श्रेयस, राहुल सर्वांनीच धावा काढल्या आहेत. सूर्यकुमार यादवला मोठी धावसंख्या उभारता आली नसली तरी तो कधीही मॅच विनिंग खेळी करू शकतो. भारताचे गोलंदाज तर स्वप्नवत कामगिरी करत आहे. भारताचे सर्वच गोलंदाज अप्रतिम कामगिरी करत प्रतिस्पर्धी फलंदाजांना जेरीस आणत आहेत. बुमाराह, शमी, सिराज, जडेजा, कुलदीप यादव या भारताच्या पाच पांडवांनी या स्पर्धेत जी कामगिरी केली आहे तशी कामगिरी याआधी भारताच्या कोणत्याही गोलंदाजांनी केलेली नाही. एकाच वेळी भारताच्या सर्व गोलंदाजांमध्ये विकेट घेण्याची स्पर्धा लागली आहे विशेष म्हणजे यात सर्वच गोलंदाज यशस्वी होत आहे. एकाच स्पर्धेत सर्वचे सर्व गोलंदाज भेदक गोलंदाजी करत असल्याचे चित्र प्रथमच पाहायला मिळत आहे. असे म्हणतात की फलंदाज सामना जिंकून देतात तर गोलंदाज स्पर्धा. भारताने या स्पर्धेवर जे एकहाती वर्चस्व गाजवले आहे ते गोलंदाजांमुळेच. गोलंदाजांचा हाच फॉर्म उपांत्य आणि अंतिम फेरीत कायम राहिला तर भारत या विश्वचषकाचा मानकरी ठरेल यात शंका नाही. अर्थात भारत फॉर्मात असला तरी बेसावध राहणार नाही कारण उपांत्य फेरीत भारताचा मुकाबला न्युझीलंडशी होणार आहे. या स्पर्धेत जरी भारताने न्यूझीलंडवर मात केली असली तरी हा संघ भारताला नेहमीच जड गेला आहे विशेषतः नॉक आऊट सामन्यात या संघाने भारताला कायम हरवले आहे. मागील विश्वचषक स्पर्धेतील उपांत्य फेरीत भारताची गाठ न्युझीलंडशीच पडली होती आणि न्यूझीलंडने भारताला स्पर्धेबाहेर ढकलले होते. विश्व टेस्ट चॅम्पियनच्या अंतिम फेरीतही न्यूझीलंडने भारताला हरवले होते.

**श्याम ठाणेदार**
दौंड जिल्हा पुणे

# सौ.सरिता म्हेत्रे -कलढोणे यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा.सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**शिवजन्मभूमी जुन्नर येथील प्रसिद्ध कवयित्री ,गझलकारा सौ. सरिता म्हेत्रे -कलढोणे यांचा जन्म २९ सप्टेंबर १९७९ रोजी झाला. त्यांचा 'शब्दांच्या गाभाऱ्यात' हा पहिलाच काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला असून काही मासिके, दिवाळी अंक, वृत्तपत्रे व प्रतिनिधिक काव्यसंग्रहातही त्यांचे लिखाण प्रसिद्ध झाले आहे. ९३व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनात कवीकट्ट्यावर काव्यवाचन करण्याची संधी सरितातार्ईंना मिळाली आहे. राज्यस्तरीय महिला गौरव पुरस्कार २०२२ देऊनही त्यांना अंमळनेर येथे गौरविण्यात आले आहे.**

महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या 'सावित्री ते जिजाऊ' या महिलांच्या



यशोगाथा उपक्रमात जुन्नर येथे त्यांचा गौरव करण्यात आला आहे. निसर्ग, प्रेम ,स्त्री जीवन, माणुसकी, देशप्रेम, शब्द, मैत्री, पक्षी, कविता, सावित्रीबाई व ज्योतिबा अशा विषयांवर विविधांगी काव्य लेखन करण्याबरोबरच सरितातार्ईंनी माहेरचे वर्णन करणाऱ्या ही बऱ्याच कविता लिहिल्या आहेत. माहेरचे वर्णन करणाऱ्या या कवितांमधून त्यांची माहेरा विषयीची ओढ , जिव्हाळा, बालपणीच्या आठवणी, आई-वडिलांविषयीची माया प्रकर्षाने व्यक्त होते.

प्रत्येक सासुरवाशीन स्त्रीला सासरी कितीही सुख असले तरी माहेरच्या आठवणीने तिचे मन व्याकुळ होतेच. सासरच्या व्यापातून चार दिवस माहेरी जावं असे प्रत्येक स्त्रीला वाटत असतं. कवयित्री सरिताताई सुद्धा आपल्या बंधू राजाला माहेरी घेऊन जाण्यासाठी विनवणी करताना दिसतात... 'माहेरची वाट' या कवितेत कवयित्री म्हणतात,

**माहेरच्या मातीला अत्तराचा गंध**
**येरे बंधू राजा घेऊन जा मला संग LLधृLL**
**घाटाने चालली ही माहेराची वाट**
**हिरवळ रानीवनी, कसा सांगू बाई थाट**
**डोलती शिवार ,पाखरं गाण्यात गं दंगLL१LL**

माहेरच्या मातीला अत्तराचा सुगंध असून घाटाने जाणारी त्यांच्या माहेराची वाट हिरवळीने नटलेली आहे. माहेरच्या वाटेवरचे शिवार हिरवळीने डोलत असून पाखरे ही गाणी गाण्यात दंग असल्याचे वर्णन कवयित्री करतात. प्रत्येक बहिणीला माहेरच्या घरट्याची ओढ असते. याविषयीचे वर्णन करताना पुढील ओळीत कवयित्री म्हणतात,

**मायेच्या घरट्याची ओढं या बहिणीला**
**भेटाया आतुर मन माझं माऊलीला**
**घरादाराशी गं वेगळाच बंध २**

कवयित्रीला माहेरच्या घरट्याची ओढ लागलेली असून माऊलीला भेटण्यासाठी त्यांचं मन आतुर झालं आहे. ज्या घरात जन्म घेऊन लहानाची मोठी झाले त्या घरादाराशी वेगळाच बंध असल्याचे पुढे कवयित्री म्हणतात.

सासरी एकांतात असताना कवयित्रीला माहेरच्या आठवणी येतात त्या म्हणतात ,कितीतरी सण येतील जातील परंतु बालपणाच्या माहेरातील मोरपिशी दिवसांच्या आठवणी सदैव मनात घोळत राहतात. या आठवणींच्या बागेचा रंग न्याराच आहे.

पुढील ओळीत कवयित्री म्हणतात,

**चार दिवसांची पाहुणी जणू तुळशीची मंजिरी**
**दारं टिपून चिमणी जाईल आपल्या घरी**
**वाऱ्यापाशी धाडते तुला रोज सांगणं**

प्रत्येक सासुरवाशीन स्त्री म्हणजेच माहेरची लेक ही माहेरात चार दिवसांची पाहुणी म्हणून येत असते. कवयित्रींनी तिला तुळशीच्या मंजिरीची उपमा दिली आहे. जशी अंगणातल्या तुळशीमुळे घराला शोभा येते.तशीच लेक माहेरी आली की,घर भरून वाटते.माहेरी आल्यानंतर चार दिवसांचा पाहुणचार व सगळ्यांच्या भेटीगाठी घेऊन ती चिमणी सारखी दाणे टिपून भुरकून आपल्या घरी उडून आपल्या घरी जाते. असे वर्णन कवयित्री करतात. शेवटच्या ओळींमध्ये कवयित्री म्हणतात.

**सासरच्या दारी सुखाचं चांदणं**
**माहेरच्या वाटेचं तरी मनात गोंदण**
**जपून ठेवीन बाई अनमोल तरंग LL५LL**

प्रत्येक सासुरवाशीन स्त्रीला सासरी जरी सुख असलं तरीही तिचं मन माहेरच्या वाटेकडे ओढ घेतं. कवयित्री म्हणतात माहेराचा हा अनमोल ठेवा मी सदैव जपून ठेवीन. कवयित्रीचे मन माहेरच्या वाटेकडे ओढ घेते. माहेरी गेल्यानंतर चार दिवसांची पाहुणी जेंव्हा सासरी जायला निघते त्यावेळच्या तिच्या मनातील भावना 'माहेराहून परतांना' या कवितेत कवित्रीने व्यक्त केल्या आहेत...

**जाताना माहेराला सई**
**मन जाई मोहरून**
**आठवांची होई दाटी**
**जसं झाड येत बहरून**

कवयित्री म्हणतात माहेरी जाताना मनात अनेक आठवणींची दाट होते. जसे एखादा झाड बहरून येतं तशा आठवणी सुद्धा मनाला मोहरून टाकतात. पुढे कवयित्री म्हणतात,

**माहेराहून परतांना**
**पावलं होती जड**
**सासरी सुख अमाप**
**परि जीवाला माहेरची कड**

माहेरी जाण्यासाठी निघालेल्या सासुरवाशीनीचे मन माहेराच्या वाटेने धावू लागते परंतु माहेराहून परतताना मात्र तिची पाऊले जड होतात. सासरी कितीही सुख असलं तरीही माहेराची आठवण तिला येतेच. पुढे कवयित्री आपल्या आई-वडिलांविषयी वर्णन करतांना 'माय-बाप वृक्षवल्ली' या कवितेत म्हणतात,

**वृक्षवल्ली मायबाप**
**नित्य मायेची सावली**
**लेकरांच्या सुखासाठी**
**दिनरात ती धावली**

कवयित्रीने आपल्या आई-वडिलांना वृक्षवेलींची उपमा दिली आहे. वृक्षवेली जशी आपल्या जीवनाला उपयुक्त असतात तसेच मायेची सावली देणारे आई -वडील सुद्धा वृक्षवेलीच आहेत. आई वडील स्वतः चंदनासारखे झिजतात व आपल्या लेकरांना भविष्य घडवतात. अशा या आई-वडिलांना उतार वयात मुलांकडून फक्त दोन प्रेमाच्या शब्दांची अपेक्षा असते त्यांची अपशब्द बोलून उतारावयात हेटाळणी व्हायला नको असेही कवयित्रीला वाटते. 'माय'कवितेत कवयित्री आईचं थोरपण वर्णन करतांना म्हणतात,

**डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड ,पासबुक**
**नात्यात ही फक्त कागद असतील,**
**आईचे कर्ज फेडण्याइतपत**
**कोणत्याच बँकेत पैसे नसतील**

नऊ महिने नऊ दिवस आई बाळाला आपल्या उदरात वाढवते. त्याला लहानाचा मोठा करते जन्माला आलेल्या या बाळांशी तिचं अद्वैत नातं असतं. स्वतः झिजून बनलेल्या तिच्या दुधाला कशाचीच उपमा देता येणार नाही. तिचे हे कर्ज इतके मोठे आहे की, जगातल्या कोणत्याच बँकेत ते कर्ज फेडण्यासाठी पैसे नसतील. तिच्या प्रेमाच्या नात्यासमोर डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड व पासबुक हे फक्त कागदच आहेत. आईबरोबरच कवयित्रीने पित्याचे ही खूप हृदयस्पर्शी सुंदर वर्णन केलेले आहे. 'बाप माझा' या रचनेत कवयित्री म्हणतात,

**येता प्रसंग बाका आधार बाप माझा**
**गरीबीतही कसा तो दिलदार बाप माझा**
**केल्या सुगंध वाटा सोसून ऊन, थंडी**
**तो एक पाहिला मी उबदार बाप माझा**

आपल्या पित्या विषयी अत्यंत हळव्या शब्दात कवयित्रीने वर्णन केले आहे. कोणत्याही कठीण प्रसंगात आधार देण्यासाठी माझा बाप सदैव पाठीशी उभा राहतो. स्वतः ऊन थंडी सोसून माझ्या जीवनाच्या वाटा त्यांनी सुगंधित केल्या असा उबदार माझा बाप आहे असे वर्णन कवयित्री करतात. 'वंशाचा दिवा' या कवितेत कवयित्रीने मुलगा व मुलगी यांमध्ये समाजात केला जाणारा भेदभाव व्यक्त केला आहे समाजात मुलाला वंशाचा दिवा व लेकीला मात्र परक्याचे धन समजले जाते.तिला जबाबदारी चे ओझे दिले जाते तर मुलाला कुटुंबाचा वारसदार म्हणून कागदपत्रे दिली जातात.. ही खंत कवयित्री कवितेत वर्णन करतात. पुढे कवयित्री म्हणतात,

**लग्न होताच होते परकी**
**ओस पडते अंगण**
**सासरी जाते सोडून**
**संपतं तिचं माहेरपण**

प्रत्येक मुलगी ही लग्न होऊन जेंव्हा सासरी जाते तेंव्हा तिला माहेर परकं वाटू लागतं... व सासर घरच तिला आपलंसं करावं लागतं. एकदा माहेर सुटलं की पुन्हा ते माहेरपण मिळतच असं नाही. माहेरातल्या कोणत्याही गोष्टीवर तिचा पूर्वीसारखा हक्क राहत नाही. अशाप्रकारे कवयित्री सरिता तार्ईंनी कवितांमधून माहेराचे अत्यंत भावस्पर्शी असे वर्णन केलेले आहे. त्यांच्या या कविता मधून हळव्या स्त्री मनाचे अनेक पदर उलगडले आहेत. प्रत्येक स्त्रीला स्वानुभूतीची जाणीव करून देणाऱ्या या कविता आहेत. त्यांच्या भावी साहित्यिक वाटचालीला माझ्या भरभरून शुभेच्छा!!

# चला प्रदूषणमुक्त दिवाळी साजरी करूया

आधुनिक केसरी

आपल्या कृषिप्रधान देशातील भारतीय सणाचा विचार करता सगळेच सण- उत्सव शेती, मातीशी घट्ट नातं असलेले दिसतात. त्यातल्या त्यात कृषी संस्कृतीमध्ये दिवाळी हा सण सगळ्यात मोठा आहे. वसुबारस, धनत्रयोदशी, नरक चतुर्दशी, लक्ष्मीपूजन, बलिप्रतिपदा, भाऊबीज असे चार-पाच दिवस चालणाऱ्या सणात मिठाई, लाडू, करंजा, कपडे, सोने, वस्तू, घर, प्लॉट खरेदीची रेलचेल असते. म्हणूनच म्हणतात दिवाळी सण मोठा नाही आनंदाला तोटा.

सगळ्यात महत्वाचे म्हणजे दिव्यांनी सजवलेल्या घर परिसरात फटाक्यांची प्रचंड आतषबाजी केली जाते. वेगवेगळे आवाज करणारे, उंचावर जाऊन आवाज करत विविधरंग उधळणारे, भुईचक्री, झाड, सुरसुरी यासोबत प्रचंड धूर आणि कानाच्या पड्द्यावर आघात करणारा फटाक्यांचा आवाज दिवाळीच्या आनंदमय प्रसंगात विघ्न निर्माण करत आहे. फटक्यांमध्ये असलेले रासायनिक सल्फर, झिंक, कॉपर, सोडियम इ. घटकामुळे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य बिघडून वायुप्रदषण होत असल्याने लोकांच्या श्वसनसंस्थेवर सर्वाधिक परिणाम होत आहे. तसेच फटाक्यांतून सल्फर,कार्बन मोनॉऑक्साइड, कार्बन डायऑक्साइड आणि नायट्रेस सारखे रासायनिक पदार्थ बाहेर पडतात. हवेतील फटाक्यामुळे सेंद्रिय संयुगे धूलिकण स्वरूपात बराच काळ राहतात. त्यामुळे पर्यावरणाचे देखील खुप मोठे नुकसान होते. परिणामी कितीतरी लोकांना अस्थमा, हृदयविकार, शिंका येणे, नाक गळणे, डोकेदुखी, डोळ्यांची जळजळ ,फुफुसाचे विकार झाल्याचे निदर्शनास आलेले आहे...

आपल्याला दिपावलीचा आनंद आबाधित ठेवायचा असेल तर काही नियम, बंधन आणि पर्याय वापरला पाहिजे. यासाठी कार्बन उत्सर्जित न करणारे, कमी आवाजाचे हरित फटाके वापरणे आवश्यक आहे. हरित फटाक्यांत वायू प्रदूषणास कारणीभूत ठरणारी रसायने नसतात. याच कारणामुळे त्यांना हरित फटाके म्हटले जाते. हे फटाके तयार करताना कमी हानिकारक आणि धोकादायक नसणारे घटक वापरले जातात त्यामुळे मानवाची, पर्यावरणाची हानी होत नाही. तरीही काळजी म्हणून फटाके आणि आवाजामुळे होणाऱ्या संभाव्य धोक्यापासून वाचण्यासाठी घराबाहेर जाताना तोंडावर मास्क घालावा, शक्यतो फटाक्यांची आतषबाजी होत असताना घराबाहेर जाऊ नये, अलर्जी असणाऱ्या रुग्णांना श्वास घेण्यास त्रास झाल्यास डॉक्टरांना दाखवणे गरजेचे आहे. अशा काही छोट्या गोष्टी केल्याने आपण काही धोके टाळू शकतो आणि दीपोत्सवाची आनंद द्विगुणित करू शकतो.

संत ज्ञानेश्वर म्हणतात...

**मी अविवेकाची काजळी |**
**फेडूनि विवेकदीप उजळी**
**ते योगिया पाहे दिवाळी |**
**निरंतर...**

असेच आपल्या मनावर चढलेली अविवेकाची जळमटे दूर केली तर आपणही ज्ञानाचा प्रकाश अखंडपणे देत राहू.

रमेश काकासाहेब शिंदे,
वाहेगाव देमणी,
(ता.जि.छत्रपती संभाजीनगर)

# मैदानी खेळ लोप पावत आहेत....

आधुनिक केसरी

आपल्या देशात विविध प्रकारचे खेळ खेळले जातात. त्यात हॉकी, कबड्डी, खोखो, लपाछी, क्रिकेट व विटी दांडू असे विविध प्रकारचे मैदानी खेळ खेळून खेळाडू आनंद द्विगुणित करत असतात. फार पूर्वीपासूनच आपल्या भारतात मैदानी खेळाला विशेष महत्व दिले जाते. भारताचा राष्ट्रीय खेळ हॉकी जरी असला तरी क्रिकेट खेळाला अधिक महत्त्व दिले जाते.हे आपल्या सर्वांना माहीतच आहे.क्रिकेट खेळ सोडला तर बाकीचे सर्व खेळ नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत.परतू या क्रिकेट खेळाप्रमाणेच इतर सर्वच खेळ आपण खेळले पाहिजेत.मान्य आहे की आपल्याकडे भारी किंमतीचे अँड्रॉइड मोबाईल आहेत व त्यामध्ये भारी भारी गेम्स आहेत.आणि आपण ते गेम आवडीने खेळतो. आणि मोबाईलवर हे बैठे गेम घरी बसून खेळण्यापेक्षा बाहेर जाऊन मैदानी खेळ खेळावेत.एकाच जागी बसून गेम खेळल्याने शारीरिक व मानसिक त्रास उद्‌भवू शकतो.माणूस आळशी वृत्तीचा बनतो. मनक्याचे आजार उद्‌भवतात. परीणामी माणूस मनोरुग्ण बनतो. सांगायचा मूद्दा काय तर मैदानी खेळामूळे आपल्या शरीराचा व्यायाम होतो. **क्रमशः**

-बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे, मो.7498715661



# ठेचा भाकर खाऊन कोविड योद्ध्यांची दिवाळी !

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शिंदे-फडणवीस- पवार खातात लाडु करंजा आम्ही खातो ठेचा भाकर अशा घोषणा देत कथित कंत्राटी कामगार कोविड योद्ध्यांनी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय औरंगाबाद आर एम ओ ऑफीस समोर बसुन ठेचा भाकरी खाल्ली व 98 कथीत कंत्राटी कामगारांना कोविड योद्ध्यांना सेवेत सामाऊन घ्या अशी मागणीही केली.

याबाबत असे की, कोव्हीड महामारीच्या दोन्हीही लाटेत ज्यांच्यामुळे शाकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) व जिल्हा प्रशासनाला मोठी मदत झाली, त्यांना काव्हीड योध्दा म्हणून घाटी प्रशासनाने प्रमाणपत्रही दिले. त्यांच्यासाठी टाळया-थाळया वाजवण्यात आल्या, दिवे विझवण्यात आले, पुष्प वृष्टी करण्यात आली, जेंव्हा कोव्हीड वार्डात जायला भिती वाटत होती, तेंव्हा वरील ९८ कथीत कंत्राटी सफाई कामगारांनी कोव्हीड रुग्णांची सुश्रुशा केली, वयोवृध्द रुग्णांचे डायपर बदलले, त्यांना पाणी, जेवण दिले, मृत्यू झालेल्या कोव्हीड रुग्णांचे पार्थीव शरीर व्यवस्थीतपणे अंत्य संस्कारासाठी रवाना केले. अशा प्राणांची बाजी लावणा-या व कठीण परिस्थीतीत प्रशासनाला मदत करणा-या ९८ कोव्हीड योद्यांना निराधार केले जात आहे. गरज सरो कोव्हीड योध्दा मरो, असा प्रकार सुरु आहे. तेंव्हा विशेष बाब म्हणून, तसेच कोव्हीड काळातील या 98 कोव्हीड योद्यांच्या कामाचे साक्षीदार म्हणून आपण त्यांना सेवेत सामावुन घ्यावे, प्रत्येक कथीत कंत्राटी सफाई कामगारांच्या नावाने सरकारी तिजोरीतून दरमहा जवळपास १५,०००/- रुपये खर्च होतात, परंतू प्रत्यक्षात कामगारांच्या हातात जवळपास १० ,०००/- रुपये




दरमहा एवढीच रक्कम मिळते. तेंव्हा सरकारी तिजोरीतून त्याच्या नावे बाहेर पडणारे दरमहा १५,०००/- रुपये एवढी तरी त्यांना थेट मिळावे, जेणेकरुन सरकारी तिजोरीवरही ताण येणार नाही व प्रशासनाला पडत्या काळात मदत करणा-या प्रामाणीक, कष्टाळू अशा 98 योद्यांच्या कामाची जाण ठेवली, असा देखील संदेश कामगारांमध्ये जाईल यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर गेल्या 11 दिवसांपासुन साखळी उपोषण सुरु आहे त्याकडे जिल्हाधिकारी व अधिष्ठाता घाटी हॉस्पीटल यांनी दुर्लक्ष केले आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय छत्रपती संभाजीनगर) येथे जवळपास अधिकृत 1700 रुग्ण क्षमता असतांना त्यापेक्षा ३ पट. जास्त रुग्ण भरती होतात, रोज जवळपास रुग्ण व नातेवाईक मिळुन १०००० नागरीक घाटी हॉस्पीटलमध्ये येतात. सद्या स्थीतीत घाटी हॉस्पीटलमध्ये जवळपास १००० चतुर्थश्रेणी कर्मचा-यांची आवश्यकता आहे. घाटीत रुग्णांना स्ट्रेचरवर व व्हील चेअरवर नेण्याचे काम नातेवाईकांनाच करावे लागते, १००० सफाई कामगारांची भरती केल्यास रुग्ण सेवा आणि स्वच्छता योग्य रितीने राखता येईल.घाटीतील अस्वच्छता हा कायम चर्चेचा विषय ठरत आहे. पुरेसे कर्मचारी नसल्यामुळे उपोषनार्थी ९८ सफाई कामगारांवर कामाचा ताण वाढत आहे, टीसीएस कंपनी मार्फत १४८ कामगारांच्या भर्तीचा निर्णय ९८ उपोषनार्थी कोव्हीड योद्यांवर अंन्याय करणारा आहे. यापुर्वी घाटी प्रशासन, माजी वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे तसेच विद्यमान वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी जाहीर केल्याप्रमाणे, तसेच मंत्रीमंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाप्रमाणे उपोषनार्थी ९८ कथीत कंत्राटी कामगार काव्हीड योद्यांना सेवेत सामाऊन घ्या, त्यानंतर उर्वरीत जागांसाठी भरती करावी अशी मागणी महाराष्ट्र कामगार कर्मचारी संघटना संलग्न आयटक दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. या मागणीकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी नाईलाजास्तव जिल्हाधिकारी कार्यालया समोर साखळी उपोषन सुरु करण्यात आले आहे. लवकरात लवकर न्याय देऊन उपोषन संपवण्यास मदत करावी, सदर उपोषनार्थी रुग्ण सेवेस अडथळा न निर्माण करता, प्रशासनास सहकार्य करुन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय औरंगाबाद येथे रोज डयुटी करुन जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद समोर उपोषणात सहभागी होत आहेत. यावेळी उपोषण मंडपात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

शिंदे फडणवीस पवार तुपाशी कोविड योद्धा उपाशी, कोविड योद्ध्यांना सेवेत सामावुन घेतलेच पाहीजे, काम घ्यायला गोड वाटत पगार द्यायला कडु वाटत, शिंदे फडणवीस खातात लाडु करंजा आम्ही खातो ठेचा भाकर इत्यादी घोषणाही दिल्या. सोबत आणलेली ठेचा भाकर यावेळी ॲड. अभय टाकसाळ, अभिजीत बनसोडे, आतिश दांडगे, गौतम शिरसाठ, श्रीयोग वाघमारे, निलेश देवकर, दीपक मगर, अमित भालेराव, सुशील कांबळे, संतोष बिरारे, सय्यद आरिफ, विजय नागोबा ,आनंद सुरडकर, सिद्धार्थ नरवडे, दिनेश साळवे, दिपक जाधव, आनंद पर्घने नंदा हिवराळे , विद्या हिवराळे, उषा भिंगारे, मनीषा हिवराळे, दीपिका पंडित, ज्योती खरात, वनिता जाधव , आम्रपाली जोगदंड, मनीषा हिवराळे , सविता घागरे, नूतन शेजुळ, उषा कांबळे, उषा साबळे ,रेशमा सय्यद, पूजा बोध, उज्वला वाघमारे, मनिषा सातपुते,सोनाबाई हजारे, विद्या इंगळे, संध्या साळवे ,वंदना भालेराव, गजानन खंदारे, वंदना बोर्डे यांनी खाऊन सहभाग नोंदवला.

## पीएम विश्वकर्मा पोर्टलवर सरपंच नोंदणीत नाशिक आघाडीवर

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** केंद्र सरकारच्या 'पीएम विश्वकर्मा' योजनेच्या अनुषंगाने जिल्ह्यात प्रगतीपथावर असलेल्या नोंदणी प्रक्रियेत १३८८ पैकी आतापर्यंत १२५६ ग्रामपंचायतीतील सरपंचांची पीएम विश्वकर्मा पोर्टलवर नोंदणी करण्यात आली आहे. सरपंच नोंदणीत राज्यातील सर्वाधिक नोंदणी नाशिक जिल्ह्यात झाल्या आहेत. या योजनेचा लाभ मिळवण्यासाठी ग्रामीण भागातील नागरिकांनी सीएमसी केंद्रात जाऊन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेने केले आहे. या योजनेअंतर्गत १८ प्रकारच्या पारंपरिक कारागिरांना बँकेतून अर्थसहाय्य मिळणार आहे. प्रथम वर्षासाठी एक लाखाचे कर्ज पाच टक्के इतक्या कमी व्याजदराने व त्याची परतफेड केल्यानंतर दोन लाख रुपये कर्ज तेही पाच टक्के इतक्याच व्याजदराने असे एकूण तीन लाखांपर्यंत कमी व्याजदराने कर्ज लाभार्थ्यांना मिळेल.

या कर्जाला कोणत्याही प्रकारची बँक हमी लागत नाही. देशाच्या स्वातंत्र्यदिनी पीएम विश्वकर्मा या योजनेची घोषणा झाली होती. विश्वकर्मा जयंतीच्या दिवशी संपूर्ण देशात या योजनेची सुरुवात करण्यात आली. ग्रामपंचायत स्तरावर सीएससी केंद्राच्या माध्यमातून पीएम विश्वकर्मा या पोर्टलवर योजनेचा लाभ घेण्यासाठी नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणी केल्यानंतर प्राथमिक पडताळणी ही गावातील सरपंच यांच्या माध्यमातून होईल. तर द्वितीय पडताळणी ही जिल्हा स्तरावरून होईल. पडताळणी यशस्वीरीत्या पूर्ण झाल्याननंतर लाभार्थ्यांना पीएम विश्वकर्मा प्रमाणपत्र व ओळखपत्र दिले जाणार आहे.

## भटक्या विमुक्तांना रोजगार, हक्काची घरे द्या : मारोती कदम

### सप्तरंगी साहित्य मंडळाने दिला आनंदाचा शिधा

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** उघड्यावर राहणाऱ्या आणि या राज्यातून त्या राज्यात पोटाची खळगी भरण्यासाठी भटकणाऱ्या कुटुंबाची कहाणी खूपच यातनादायी आहे. आज इथं तर उद्या कुठंतरी असा संसाराचा रहाटगाडा ओढत नेतात; स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षात उपेक्षित जीवन जगावे लागते यापेक्षा दुर्दैव काय असणार आहे? प्रशासनाने यांचे सर्वेक्षण करून हक्काची घरे आणि रोजगार उपलब्ध करून दिल्यास त्यांची जीवन जगण्याची त्यांची ससेहोलपट निश्चित थांबेल असे मत भटक्या विमुक्तांच्या सामाजिक व सांस्कृतिक चळवळीचे अभ्यासक मारोती कदम यांनी व्यक्त केले. यावेळी सामाजिक कार्यकर्ते शामराव वाघमारे, अशोक मल्हारे, स्तंभलेखक मारोती कदम, समीक्षक प्रज्ञाधर ढवळे यांची उपस्थिती होती. येथील सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने शहरातील विविध भागात तात्पुरत्या स्वरूपात वास्तव्याला असलेल्या



मणी, मोती, खेळणी, शोभिवंत वस्तू, औषधी, गृहोपयोगी वस्तू वगैरे विक्री करुन पोट भरणारे राज्यातील तथा परराज्यातील भटक्या विमुक्त जाती जमातीतील शंभराधिक कुटुंबांना टप्प्या टप्प्याने दिपावली निमित्त सप्तरंगी साहित्य मंडळाचे माजी राज्याध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक अनुरत्न वाघमारे, कार्यालयीन सचिव मारोती कदम, राज्य कोषाध्यक्ष शंकर गच्चे, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे यांच्या पुढाकारातून 'आनंदाचा शिधा' वाटप करण्यात आला. तसेच इतर सेवाभावी संस्थांना मदतीसाठी पुढे येण्याचे आवाहनही यावेळी मंडळाच्या वतीने करण्यात आले. दिवाळी हा सण आनंदाचा, उत्साहाचा तसाच तो खाद्यपदार्थांचाही उत्सव आहे. पण ज्याला स्वतःची म्हणून हक्काची जमीन नाही आणि स्वतःच म्हणून हक्काच छत नाही असे भटके-विमुक्त पावसाळ्याचे चार महिने जेमतेम कुठेतरी बुड टेकतात. मात्र, पावसाळा संपला की ते आजही पोटाची खळगी भरण्यासाठी गावोगाव फिरत असतात. काही कुटुंबे खलबत्ता, तवा, कढई, आटवा, चिमटे, चिपटे, पळी असे विविध गृहोपयोगी लोखंडी साहित्य रोडच्या कडेलाच आपले पाल उभ्या करुन विकताना दिसत आहेत. शहरातील स्टेडियम परिसर, रेल्वे स्टेशन परिसर, हिंगोली गेट, वाजेगाव धनेगाव परिसर अशा अनेक ठिकाणी ते वास्तव्याला आहेत. या कुटुंबांना राज्य सरकारच्या धर्तीवर जे कुटुंब लाभार्थीच नसलेल्या कुटुंबांना आनंदाचा शिधा वाटप करण्यात आला.

## कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना फराळ व शैक्षणिक साहित्य

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** आपण ज्या समाजात मोठे होतो त्या समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या सामाजिक जाणिवेतून उरण तालुक्यातील मोरा रोड वरील बोरी नाका येथील स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठानचे सीबर्ड विशेष मुलांची शाळेत कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना दिवाळी फराळ वाटप तसेच चित्रकलेची वही, कलर पेटी, केऑन बॉक्स आदी शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना फराळ वाटप व शैक्षणिक साहित्य मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद दिसत होता. यावेळी कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुमित पाटील,उपाध्यक्ष नकूल पाटील, सचिव प्रणय पाटील,सहसचिव प्रथम तांडेल, खजिनदार सुरेंद्र पाटील, कार्याध्यक्ष ऋषिकेश म्हात्रे, सल्लागार रमेश पाटील , सरपंच कुणाल पाटील , उपसरपंच सतीश पाटील , ग्रामविकास मंडळाचे उपाध्यक्ष सुरेंद्र पाटील , सामाजिक कार्यकर्ते अरुण पाटील , शिवसेना उपशाखा प्रमुख महेश पाटील, सुप्रसिद्ध



निवेदक अतिश पाटील, रोशन म्हात्रे, आकांक्षा म्हात्रे,अमित पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.स्वामी ब्रह्मनंद प्रतिष्ठानचे सिबर्ड विशेष मुलांची शाळेचे मानद सचिव शिरीष पुजारी, विश्वस्त चारू शहा, सुपरवायजर माधुरी उपाध्ये, मुख्य शिक्षिका पल्लवी परदेशी, शिक्षिका मानसी पांचाळ, शिक्षक राकेश म्हात्रे व शाळेच्या कर्मचाऱ्यांनी एका चांगल्या कार्यक्रमाचे आयोजन केल्याने व दिवाळी विद्यार्थ्यांसोबत साजरी केल्याने कुणाल पाटील युवा सामाजिक संस्थेच्या सर्व पदाधिकारी, सदस्यांचे व उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.



# नेतृत्व करण्याची संधी डॉ.नितीन सावंत यांना द्यावी : खा.श्रीनिवास पाटील

## फुलू द्या, वाढू द्या, मोठं होऊ द्या लोणंद हाच आनंद




आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** दीपावली सणाच्या निमित्ताने लोणंद ता.खंडाळा येथे सुवर्णगाथा प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. नितीन उत्तमराव सावंत यांच्या वतीने शनिवार दि.११ नोव्हेंबर २०२३ रोजी "स्वर दीपावली" या गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी खा.श्रीनिवास पाटील हे होते. डॉ.नितीन सावंत यांच्या कार्याबद्दल खा.श्रीनिवास पाटील यांनी कौतुक करत असताना या भागाचे नेतृत्व करण्याची संधी आपण डॉ.नितीन सावंत यांना द्यावी.असे उपस्थित असलेल्या जनसमुदाया समोर म्हटले.तसेच यावेळी त्यांनी स्वर दीपावली कार्यक्रमातून सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा दिल्या.गायिका संपदा गाळवेकर,गायक श्रीरंग जोशी यांच्या कडून आली माझ्या घरी ही दिवाळी या गाण्यासह अनेक गाणी सादर करण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सारंग पाटील यांच्या सह इतर मान्यवर उपस्थित होते. डॉ.नितीन सावंत यांच्या बद्दल खासदार श्रीनिवास पाटील म्हणाले की, त्यांच्या हातामध्ये आज इंजेक्शन आहे. सहज कुणी तरी म्हटलं ह्याला ही देतात,त्याला ही देतात. इंजेक्शन देणे ही भावना बरे करण्याची दिसते आहे. आपलं बोट आपल्या डोळ्यात जाते तेव्हा आपण आई गं म्हणतो. आपली बहीण पळत येते आणि तिच्याच साडीचा बोळा करून लावते.बरं वाटतं पण बरं होतं का? बरं व्हायला दवाखान्यात जायला लागतं.बरं वाटतं ही बहीण आणि बरं व्हायला जावं लागतं ते डॉ.नितीन सावंत,बरं व्हायला डॉ.नितीन सावंत यांच्याकडे जावं.असे सुद्धा त्यांनी म्हटले. पुढे म्हणाले की,गाणं हे धबधब्या सारखं असतं. ते मंजुळ असतं.झुळझुळ वाहत असतं.खळखळत नाही.जे दरवळतय ते फुल,खळखळतय ते पाणी पण खळखळणारं पाणी शुद्ध होतं, त्यात ओंजळ भरता यावी.पोटापुरता पसा पाहिजे. तो पसा बोटा बोटांनी देता यावा.देणाऱ्याला आनंद व्हावा.तो डोळे भरुन रहावा.जो आनंद आहे तो डॉ.नितीन सावंत यांना मिळावा.एवढंच सांगतो,फुलू द्या, वाढू द्या,मोठं होऊ द्या लोणंद हाच आनंद असेही त्यांनी म्हटले. श्रीनिवास पाटील यांनी साताऱ्याच्या परंपरेबद्दल बोलताना नायगावची आपली सावित्री, कटगुणचे महात्मा, सात नोव्हेंबर ज्यांनी मराठी शाळेत नाव घातलं ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर, स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी म्हणणारे यशवंत आदींचे दाखले दिले. सुवर्णगाथा प्रतिष्ठाचे अध्यक्ष डॉ.नितीन सावंत म्हणाले की,खऱ्या अर्थाने या महाराष्ट्राच्या या मातृभूमीला आपल्या मनामध्ये ही गीते ऐकल्यावर नक्कीच आपल्या सर्वांना स्फुरण चढतं. ही भूमी जेव्हा महाराष्ट्राची वेळ येते. त्यावेळी हा महाराष्ट्र शांत राखण्यासाठी ह्या भूमीतील प्रत्येक भूमीपुत्र पेटून उठतो. महाराष्ट्राचा हा थोर वारसा आठवून आपली पुढची वाटचाल राहील, असा विश्वास सर्वांना दीपावलीच्या शुभेच्छा देताना व्यक्त केला. गाण्याची मैफिल ऐकताना सर्वांनी मनमुरादपणे आनंद लुटला.

# कर्मचाऱ्यांचे पीपीई किट घालून आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांनी आरोग्य विभागात कायम करण्याच्या मागणीसह १०० टक्के मानधन वाढीसाठी गेल्या १८ दिवसांपासून कामबंद आंदोलन पुकारले आहे. या आंदोलनाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आंदोलनकर्त्यांनी शनिवारी पालकमंत्री संजय राठोड यांच्या टिळकवाडीतील निवासस्थानासमोर पीपीई किट परिधान करून स्वछता मोहीम राबवत काळी दिवाळी साजरी केली. मात्र पालकमंत्र्यांनी या आंदोलनाची साधी दखलही घेतली नाही. 'एनआरएचएम' कर्मचाऱ्यांच्या आंदोलनाकडे स्थानिक लोकप्रतिनिधिंसह पालकमंत्र्यांनी पाठ फिरवली. त्याचा निषेध नोंदवित आंदोलनकर्त्यांनी पालकमंत्री राठोड यांच्या निवास्थानाजवळील अस्वच्छ रस्ते साफ करून काळ्या रांगोळ्या काढल्या व दिवे लावून शासनाला सुबुद्धी देण्याची प्रार्थना केली. कोविड योद्धा म्हणून कौतुक होऊनही आरोग्य कर्मचारी कायमस्वरूपी नोकरीपासून वंचित आहेत.

# रेल्वेत तिकिटांचा काळाबाजार

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** मध्य रेल्वेच्या सुरक्षा दलाने आरक्षित तिकिटांचा काळाबाजार आणि दलालांना रोखण्यासाठी तसेच अधिकृत प्रवाशांचे हित जपण्यासाठी तिकिटांचा काळाबाजार करणाऱ्यांविरुद्ध मोहीम तीव्र केली आहे. एप्रिल ते ऑक्टोबर या सहा महिन्यात २६९ गुन्ह्यांची नोंद तर, ३१७ जणांना अटक करण्यात आली आहे. सायबर विभागाकडून मिळालेली माहिती आणि इतर पूरक माहिती आधारे मध्य रेल्वेचे सुरक्षा पथक छापे टाकत आहे. मध्य रेल्वेच्या पाचही विभागातील खासगी वाहतूकदारांच्या आवारात हे छापे टाकण्यात आले. एप्रिल ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत दलालीच्या २६९ गुन्ह्यांची नोंद करण्यात येऊन आतापर्यंत ३१७ जणांना रेल्वे कायद्याच्या कलम १४३ अंतर्गत अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून रु. ३.४२ लाख दंड वसूल करण्यात आला. या २६९ प्रकरणांपैकी २३ एप्रिल ते ऑक्टोबर २०२३ या कालावधीत एकट्या मुंबई विभागात ९७ गुन्हे दाखल झाले असून आतापर्यंत ११७ जणांना अटक करण्यात आली आहे.

# गुटखा विक्रेत्यावर कठोर कारवाई : रोडे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** सध्या गुटखा विक्रेतेला उत आला आहे चढा भावाने गुटखा विक्री होत असुन गुटखा सुंगधी तंबाखु विक्रीस बंदी असुन मात्र शहरातील बस्टॉप छाजेड नगर, शिवाजी महाराज पुतळा रोड, हिवरखेडा रोड, चाळीसगाव रोड, सिद्दीक चौक इत्यादी ठिकानी लाखो रुपायाची गुटखा व सुगंधी तंबाखुची उलाढाल होत आहे कुंजखेडा येथे अवैधरित्या गुटखा विक्री साठी सुमारे 1 लाख 650 रूपयाचा मुद्देमाला सापडला असुन विक्रेते वर वर्षा रोडे यांनी कारवाही केली आहे या वेळी अन्न सुरक्षा अधिकारी वर्षा रोडे बोलतांनी म्हणाल्या की इतर ठिकानी ही छापे मारून कारवाही केली जाईल आत्ता रोडे या काय कारवाही करणार या कडे सर्वाचे लक्ष लागले आहे.



# आदिवासींसोबत उरण महाविद्यालयाची दिवाळी

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाची माजी विद्यार्थी संघटना व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम एन.गायकवाड व प्रा. के ए शामा यांच्या मार्गदर्शनाखाली विंधणे आदिवासी वाडी येथील कातकरी बांधवांसोबत दिवाळी साजरी करण्यात आली. यावेळी वाडीवरील 130 महिलांना साड्या व लुगडी वाटप केले तसेच एकूण 125 पुरुषांना टॉवेल, एकूण 70 मुलांना शालेय साहित्य व विद्यार्थ्यांनी आणलेला घरी तयार केलेला दिवाळीचा फराळ वाटप करण्यात आला. प्रा.के. ए.शामा सर यांच्या संकल्पनेतून गेली एकवीस वर्ष महाविद्यालय आदिवासी बांधवांसोबत दिवाळी साजरी करत असते. आदिवासी बांधवांनाही हा सण आनंदाने साजरा करता यावा या उद्देशाने महाविद्यालयाने हा उपक्रम हाती घेतला आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बळीराम एन. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांमध्ये गरीब समाजा प्रति आत्मीयता वाढावी व त्यांच्यामध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी हा या कार्यक्रमाचा उद्देश असल्याचे सांगितले. यावेळी रमेश ठाकूर (महाविद्यालय विकास समितीचे सदस्य) उपस्थित होते.



# कन्नड येथे गुणवंत आयटीआय उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** येथील महालक्ष्मी माता बहुउदेशीय संस्था शिरोडी संचलित - ज्ञानदा कौशल्य विकास संस्था( आय टी आय) कॉलेज कन्नड जि छत्रपती संभाजीनगर 2021. ब्याच. डिप्लोमा कोर्स इन इलेक्ट्रिशियन या ब्याचमधील उत्तीर्ण झालेल्या विध्यार्थी यांना. गुणपत्रक /प्रमाणपत्र / देऊन संस्थेने गुणवंताचा सत्कार सोहळा आयोजित केला होता यामध्ये प्रामुख्याने ज्ञानदा कौशल्य विकास संस्थेतून बांधकाम पर्यवेक्षक या.कोर्स मधून उत्तीर्ण सुरेखा काळे यांचा विशेष सत्कार संस्थेमार्फत आयोजित केला होता याचे विशेष कारण म्हणजे या संस्थेतुन उत्तीर्ण होऊन आज बांधकाम उप विभाग कन्नड येथे स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक म्हणून सरकारी नोकरीवर कार्यरत आहेत आमच्या संस्थेचे नाव प्रमुख यादीत यांनी झळकावले आहे तसेच डिप्लोमा कोर्स इन इलेक्ट्रिशियन या कोर्स मधील उत्तीर्ण विध्यार्थी यांनी संपूर्ण मराठवाड्यात आपल्या संस्थेचे नाव उंचावले आहे त्यापैकी प्रथम विध्यार्थीनी कुंठे एश्वर्या साहेबराव हिने 86% मिळवले दुतीय -कुंठे महेश्वरी साहेबराव -84.11% तृतीय - भाडाईत अर्जुन विठ्ठल - 83.22% व बाकी गुणवंत विध्यार्थी यांचा संस्थेचे अध्यक्ष विलास इंगळे सर यांनी सन्मानचिन्ह देऊन प्रमुख मान्यवर यांच्या हस्ते गुणपत्रक / DEGREE सर्टिफिकेट देऊन स्वागत केले व विध्यार्थी यांना मार्गदर्शन केले या कार्यक्रमासाठी उपस्थित प्रमुख पाहुणे केरे (मु अ . साने गुरुजी विध्यालय कन्नड मा श्री संतोष मतसागर( उपप्राचार्य वि पा POLYTECHNIC कॉलेज कन्नड विजय शिंदे ( प्राध्यापक भैरवनाथ कॉलेज भटाना अरुण वरपे ( अध्यक्ष संत शिवाई बहुउदेशीय संस्था शिऊर ज्ञानेश्वर बारगळ सर( जिल्हा परिषद शिक्षक बोलठाण श्रीमती सुरेखा काळे ( स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक बांधकाम उपविभाग कन्नड) अमृता इंगळे मॅडम( सचिव /प्राचार्य) सचिन पिंपळे ( उपप्राचार्य ज्ञानदा कौशल्य विकास संस्था मोहन भोजने ( वरिष्ठ लिपिक देवदत्त कौशल्य विकास ढेकू) भारत शिंदे ( प्रशिक्षक) प्राजक्ता मोरे( प्रशिक्षक) शीतल पाटील , अपर्णा जाधव, अश्विनी चादर, जयश्री वाडीले, प्रियंका घुले, आकांशा वाबळे, सर्व प्रथम व दुतीय वर्षातील शिक्षण घेत असलेले विध्यार्थी उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन




अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# सुरेश वाडकर यांना गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्य शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत प्रदान करण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून २०२३ चा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जेष्ठ गायक सुरेश वाडकर यांना जाहीर झाला आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी आज ही घोषणा केली. गान सम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार, नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवनगौरव पुरस्कार, संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवन गौरव पुरस्कार, भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार, राज्य सांस्कृतिक पुरस्कार इत्यादी पुरस्कार सांस्कृतिक कार्य संचालनालय मार्फत दरवर्षी देण्यात येतात. सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने दरवर्षी देण्यात येणाऱ्या जीवनगौरव पुरस्कारांच्या रकमेत पुरस्काराच्या रकमेत दुप्पट वाढ करण्यात आली असून राज्य सांस्कृतिक पुरस्काराची रक्कम तिप्पट करण्यात आली आहे तसेच पुरस्कारांच्या क्षेत्रांमध्येही विस्तार करण्यात आल्याचे समाधान असून राज्याचे सांस्कृतिक क्षेत्र संपन्न व्हावे यासाठी तत्पर असल्याची प्रतिक्रिया सांस्कृतिक कार्य कार्यमंत्री ना. सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केली आहे.

ना. सुधीर मुनगंटीवार यांच्या मार्गदर्शनात घोषित झालेले पुरस्कार व निवड करण्यात आलेले मान्यवर यांचा तपशील पुढील प्रमाणे आहे. २०२३ चा गान सम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार जेष्ठ गायक सुरेश वाडकर यांना जाहीर झालेला आहे. संगीत व गायन



क्षेत्रातील सातत्यपूर्ण आणि अमूल्य योगदान देणाऱ्या कलाकारास हा पुरस्कार देण्यात येतो. भारतरत्न पंडित भीमसेन जोशी शास्त्रीय संगीत जीवन गौरव पुरस्कार 2022 पुरस्कारासाठी पं. उल्हास कशाळकर यांचे नाव घोषित झाले असुन, 2023 च्या पुरस्कारासाठी पं. शशिकांत (नाना) श्रीधर मुळ्ये यांची घोषणा करण्यात आली आहे. शास्त्रीय संगीतासाठी ज्यांनी आपले जीवन समर्पण केले आणि शास्त्रीय संगीत क्षेत्राची सेवा केली, त्या कलाकारांच्या योगदानाबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात येतो. नटवर्य प्रभाकर पणशीकर रंगभूमी जीवन गौरव पुरस्काराच्या 2022 साठी सुहासिनी देशपांडे यांच्या नावाची घोषणा झाली आहे तर 2023 साठी अशोक समेळ यांना पुरस्कार घोषित झाला आहे. मराठी रंगभूमीवर ज्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे, अशा कलाकारांना या पुरस्काराने गौरविण्यात येते. संगीताचार्य अण्णासाहेब किर्लोस्कर संगीत रंगभूमी जीवनगौरव 2022 चा पुरस्कार नयना आपटे यांना जाहीर झाला असून, 2023 च्या पुरस्कारासाठी पं. मकरंद कुंडले यांची निवड झाली आहे. ज्या कलाकारांनी संगीत रंगभूमीसाठी विशेष योगदान दिले आहे त्या कलाकारांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांस्कृतिक कार्य संचालनालयामार्फत देण्यात येणाऱ्या राज्य सांस्कृतिक पुरस्कार 2022 व 23 ची ही घोषणा केली आहे. राज्य सांस्कृतिक पुरस्कारांमध्ये एकूण बारा वर्गवारी असून, यामधील प्रत्येक वर्गवारी मध्ये दोन वर्षाचे दोन पुरस्कार जाहीर झाले आहेत. नाटक या विभागासाठी 2022 चा पुरस्कार वंदना गुप्ते यांना तर 2023 चा पुरस्कार ज्योती सुभाष यांना जाहीर झाला आहे. उपशास्त्रीय संगीत वर्गवारीमध्ये 2022 चा पुरस्कार मोरेश्वर निस्ताने यांना जाहीर झालेला असून, 23 चा पुरस्कार ऋषिकेश बोडस यांना जाहीर झाला आहे. कंठ संगीत प्रकारातील 2022 चा पुरस्कार अपर्णा मयेकर यांना घोषित झाला असून, 2023 चा पुरस्कार रघुनंदन पणशीकर यांना मिळाला आहे. लोककला क्षेत्रातील 2022 चा पुरस्कार हिरालाल रामचंद्र सहारे यांना जाहीर झाला.



# ॲसेंड स्कूलमध्ये 'फन फेअर' साजरा

## विद्यार्थ्यांनी पदार्थ विक्रीतून घेतले व्यावहारिक ज्ञान

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** ॲसेंड इंटरनॅशनल स्कूल निरा-पिंपरे या शाळेत फन फेअरचे आयोजन करण्यात आले होते.या फन फेअर मध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेत हा फन फेअर अतिशय उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न केला.विद्यार्थ्यांनी भारतीय खादय संस्कृतीचे जतन करत विविध खाद्य पदार्थांची मेजवानी पाककलेच्या माध्यमातून सादर केली. साउथ इंडियन पद्धतीचा डोसा,इडली, आप्पे, उताप्पा, त्याचप्रमाणे महाराष्ट्रीयन लोकांच्या आवडीचे सुप्रसिद्ध झुणका-भाकर,वडापाव, कोथिंबीर वडी, पुलाव, बाकरवडी, लाबजामून, शेंगदाणा बर्फी, लाडू तसेच चायनिज पद्धतीचे नुडल्स, फ्राइड-राइस, व्हेज मंच्युरिअन असे विविध पदार्थ बनवलेले होते. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय आयुर्विमा महामंडळ, शाखा लोणंदचे शाखाधिकारी भरत गोडसे, विकास अधिकारी दिपक वळवी यांची विशेष हजेरी होती. तसेच संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सोमनाथ खोमणे, सचिव निता खोमणे, जयजित खोमणे,लहू शिंदे व इतर मान्यवर तसेच शिक्षक शिक्षिका वृंद व पालक वृंद उपस्थित होते. या आयोजना बद्दल पालकांनी विशेष कौतुक केले. विदयार्थ्यांनी बनविलेल्या विविध पाककलेची चव घेण्यासाठी शाळा परिसरातील बहुसंख्य पालकवर्ग नागरिक यांनी मोठ्या संख्येत हजेरी लावली होती. हे आयोजन करण्यामागचा नेमका हेतू काय ? याची पार्श्वभूमी या फन फेअरमधून विविध खाद्य पदार्थांचे सादरीकरण केल्यानंतर समजून आले. खाद्य पदार्थ बनविण्यासोबतच विद्यार्थ्यांमध्ये व्यवहारिक ज्ञान ,बाजारात कशा प्रकारे खरेदी विक्री होत असते. याचा प्रत्यय प्रत्यक्षात या कृतिशील फन फेअर मधून घेता आला आहे.विशेष म्हणजे यातून प्रत्येक खाद्यपदार्थाच्या स्टॉल वरून पालकांनी खाद्य पदार्थांची खरेदी करत असताना विद्यार्थ्यांनी आर्थिक फायदा मिळविला. तसेच पालकांनी सुद्धा आनंद व्यक्त करत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सुषमा भुंगे यांच्या प्रोत्साहन पर मार्गदर्शनाखाली हा फन फेअर संपन्न करण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विशेष मेहनत घेतली.यावेळी सुरेखा पाटोळे,रुपाली शितोळे,मंजूश्री काटकर,आशालता काकडे,पुष्पा शिंदे, यास्मीन सय्यद,किशोरी थोपटे, नितीन दगडे, अल्पना फरांदे, दिपीका निगडे,माधुरी ठोंबरे आदी गुरुजन वर्ग उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनिषा धायगुडे व सुजाता जाधव यांनी केले.

# काशी विश्वेश्वर येथे शिवपिंडीची होणार महापूजा

## पंतप्रधान मोदी, योगी आदित्यनाथांच्या उपस्थितीत विश्वशांती सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**इगतपुरी :** उत्तर भारतातील पुण्यस्थळ असलेले देवभूमी वाराणसी उर्फ काशी येथे एक सुमारे एक कोटी शिवपिंडींची सामूहिक महापूजा आयोजित करण्यात आली आहे. ही ऐतिहासिक महापूजा दि १९ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर रोजी होणार आहे. देशातील विविध भागांमध्ये हे एक कोटी शिवलिंग तयार करून ते श्रीक्षेत्र काशी येथे एकत्र जमा करण्याचे काम प्रगतीपथावर सुरू आहे. जगभरात सुरू असलेले युद्धमय वातावरण हे मनुष्य प्राण्याच्या विनाशाचे कारण बनू पाहतंय,त्या अनुषंगाने कोटी शिवलिंग तयार करून त्यांची सामूहिक महापूजा करून विश्वशांती महायज्ञ सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर उत्तर प्रदेशातील श्री क्षेत्र काशी नगरी या ऐतिहासिक सोनेरी क्षणांचे साक्षीदार होण्यासाठी आतुरतेने सजली असून महापूजेला देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, त्याचप्रमाणे तिन पिठाचे शंकराचार्य आणि भारत भरातून तसेच देश विदेशातून संत महात्मे उपस्थित राहणार आहेत.

# मानोरी खु. खरेदी-विक्री केंद्रावर भुसार व तेलबिया, शेतीमाल लिलावास सुरूवात

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** लासलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्यामानोरी खु. फाटा येथे दिपावली पाडव्याच्या शुभमुहूर्तावर मंगळवार, दि. १४ नोव्हेंबरपासुनभुसार व तेलबियाशेतीमाललिलावास सुरूवात होणार असल्याची माहिती बाजार समितीचे सभापती बाळासाहेब क्षिरसागरयांनी दिली.



निफाडतालुक्यातील मौजे मानोरी खु, देवगांव, शिरवाडे, वाकद, कानळद, खेडलेझुंगे, कोळगांव, भरवस, वाहेगांव, गोंदेगांव, गोळेगांव ह्या गावांसह येवला, सिन्नर, कोपरगांव ह्यातालुक्यातीलशेतकरी बांधवांना त्यांचा भुसार व तेलबिया शेतीमाल विक्री करणे सोईचे व्हावे यासाठी बाजार समितीने मौजे मानोरी खु. येथे तात्पुरते खरेदी-विक्री केंद्र स्थापन केले असुन सदर केंद्रावर दिपावली पाडव्याच्या शुभमुहूर्तावर भुसार व तेलबिया ह्या शेतीमालाचे लिलाव सुरू होणार आहे. मानोरी खु.फाट्यावर बाजार समिती खरेदी केंद्र व्हावे यासाठी संचालक डॉ.श्रीकांत आवारे प्रयत्नशील होते. सदर खरेदी-विक्री केंद्रावर शेतकरी बांधवांनी त्यांचा भुसार व तेलबिया हा शेतीमाल विक्रीसाठी आणल्यानंतर बाजार समितीच्या नियमाप्रमाणे सदर शेतीमालाचा जाहीर लिलाव होणार असून लिलावानंतर इलेक्ट्रॉनिक काट्यावर चोख वजनमाप वत्यानंतर लगेचचरोख चुकवती देण्यातयेणार आहे.

भुसार व तेलबियाशेतीमालखरेदीस इच्छुक असणा-या व्यापा-यांनी लायसेन्सबाबतच्या सर्व अटी पुर्ण केल्यास त्यांना तात्काळ परवाना देण्यात येणार असल्याचे सभापती क्षिरसागर यांनी सांगितले. शेतकरी बांधवांनी त्यांचाभुसार व तेलबियाशेतीमालमंगळवार दि.१४ नोव्हेंबरपासून बाजार समितीच्या मानोरी खु. (फाटा) येथील तात्पुरत्या खरेदी-विक्री केंद्रावरविक्रीसाठी आणावा असे आवाहन बाजार समितीचे सभापती बाळासाहेब क्षिरसागर, उपसभापती गणेश डोमाडे, सचिव नरेंद्र वाढवणे यांचेसह सर्व सदस्य मंडळाने केले आहे.



# डॉ. श्रीकांत पाटील यांचा भव्य सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर यांनी कोल्हापूर येथील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक तथा राज्य शासन पुरस्कार प्राप्त लेखक आणि प्रख्यात समीक्षक डॉ. श्रीकांत पाटील यांचा छत्रपती संभाजीनगर येथील शाहू हॉलमध्ये ९ नोव्हेंबरला जगतगुरू तुकोबाराय साहित्य परिषदेच्या कार्यक्रमात शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन ग्रामीण साहित्यिक अय्युब पठाण लोहगावंकर यांनी डॉ. श्रीकांत पाटील यांचा दर्जेदार साहीत्य लेखन कार्याबद्दल यथोचित सत्कार केला. या प्रसंगी श्री. डॉ. श्रीकांत पाटील यांना अय्युब पठाण यांचे पुस्तके, आईचा हात, पाणक्या, ज्ञानपोई, मायबाप हे साहित्य भेट म्हणून दिले. यावेळी कोल्हापूर येथील प्राचार्य शिवाजी बागल, अजयकुमार वंगे यांची विशेष उपस्थिती होती.

गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in